कर्नाटक सरकार

माय–मराठी

इयत्ता सातवी

मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

MARATHI FIRST LANGUAGE

Part - 2

REVISED

KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)
6th Cross, Malleshwaram,
Bangalore - 560 003.

अनुक्रमणिका

द्वितीय सत्र


क्र.सं.	पाठाचे / कवितेचे नाव	लेखक / लेखिका / कवी	पृष्ठक्र.
13	संतवाणी (अभंग) (श्लोक)	संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास	1
14	डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद	संकलित	11
15	तीन प्रश्न – चित्रकथा	डॉ. चित्रा नाईक	17
16	क्षणात जिंकीन (कविता)	नारायण सुर्वे	25
17	आमची गोव्याची सहल		31
18	वयाची अट नाही	मूळ लेखिका–सुधा मूर्ती मराठी अनुवाद – लीना सोहोनी	39
19	अपंग आम्हा म्हणू नका (कविता)	शांता ज. शेळके	48
20	जावयाची करामत	द.मा. मिरासदार	53
21	वाढती लोकसंख्या – एक समस्या	संकलित	59
22	भलरी (कविता)	गिरीश	64
23	मनातले चांदणे	मधू मंगेश कर्णिक	69
24	वीर स्त्री रायबागन	स्वाती महाळंक	79
25	शब्दखेळ		85
26	गोडगाणी (पूरक अभ्यास)		89
*	शब्द संग्रह		92

© IBS NOT TO BE REPUBLISHED

13. संतवाणी

Y7C9H4

संत ज्ञानेश्वर - (1275-1296) : मराठीतील श्रेष्ठ संतकवी 'भावार्थ दीपिका' (ज्ञानेश्वरी), 'अनुभवामृत (अमृतानुभव)', 'चांगदेव पासष्टी' ही त्यांची प्रसिध्द ग्रंथसंपदा. शिवाय त्यांनी बरेच स्फुट अभंगही लिहिले आहेत.




ज्ञानेश्वरांचे पूर्ण नाव ज्ञानदेव विठ्ठलपंत कुलकर्णी, भागवत धर्माच्या झेंड्याखाली सर्व जाती जमातीच्या लोकाना त्यांनी एकत्र आणले. त्यानी लहान वयातच समाधी घेतले. या अल्प आयुष्यातच त्यानी 'ज्ञानेश्वरी,' 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी', अभंग, विराण्या, गौळणी असे विपुल साहित्य निर्माण केले. 'ज्ञानेश्वरी' म्हणजे गीतेवरील टीका होय.

मनाचे इच्छित पूर्ण करण्याचे सामर्थ्य एकमेव सद्गुरुंच्या ठिकाणी असते. हे सांगण्यासाठी ज्ञानेश्वरांनी अनेक दृष्टांत दिले आहेत. गुरुचे महत्व सांगतांना गुरुला कल्पतरूची उपमा देऊन जीवनात गुरुचे स्थान किती अनन्य आहे, हे सांगितले आहे.

श्री गुरुसारिखां असतां पाठीराखा ।
इतरांचा लेखा कोण करी ।।१।
राजयाची कांता काय भीक मागें ।
मनाचिया जोगे सिध्दि पावे ।।२।।
कल्पतरु तळवटी जो कोणी बैसला ।
काय वाणी त्याला सांगिजोजी ।।३।।
ज्ञानदेव म्हणे तरलों तरलो ।
आतां उध्दरलो गुरुकृपें ।।४।।

NOT TO BE RE @YD



संत तुकाराम-(1608-1650) : मराठीतील प्रसिध्द संतकवी. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा मोरे (आंबिले) असे होते सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवन व्यवहारातील उदाहरणे, दृष्टांत देऊन लोकांना समजेल अशा भाषेत त्यांनी सुमारे साडेचार हजारांहून अधिक अभंग लिहिले आहेत. त्यांच्या काव्यपंक्ती आजही म्हणींप्रमाणे सर्वसामान्यांच्या जिभेवर खेळतात. नित्य व्यवहारात जागोजागी वापरल्या जातात.

संत तुकारामबुवांच्या अभंगांची गाथा हा त्यांचा प्रसिध्द ग्रंथ. माणसाच्या जीवनात वृक्ष किती महत्वाचे आहेत हे या प्रस्तुत अभंगातून तुकाराम सांगत आहेत.

पर्यावरण प्रदूषणावर रामबाण उपाय म्हणजे वृक्ष लागवड

हे प्राचीन काळापासून संत महंत सुध्दा सांगत आलेले आहेत. हे प्रत्यक्ष वाचा संत तुकारामांच्या अभंगात

वृक्ष वल्ली आम्हां सोयरी वनचरे ।
पक्षी ही सुस्वरे आळविती ।।१।।
तेणे सुखे रुचे एकांताचा वास ।
नाही गुणदोष अंगा येत ।।२।।
आकाश मंटप पृथिवी आसन ।
रमे तेथे मन क्रीडा करी ।।३।।
कंथा कमंडलु देह उपचारा ।
जाणवितो वारा अवसरु ।।४।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार ।
करोनी प्रकार सेवूं रुची ।।५।।
तुका म्हणे होय मनासी संवाद ।
आपुलाचि वाद आपणांसी ।।६।।

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



संत रामदास-(1608-1681) : संत रामदासांचे पूर्ण नाव नारायण सूर्याजी ठोसर होते. परमार्था प्रमाणे संसार-प्रपंचवादाचा समर्थपणे पुरस्कार करणारे संतकवी. 'दासबोध' हा त्यांचा प्रसिध्द ग्रंथ. याशिवाय स्तोत्रे, करुणाष्टके, अभंग, मनाचे श्लोक इत्यादी त्यांच्या रचना प्रसिध्द आहेत, त्यांची भाषा ठसठशीत, नेमकी, सुलभ व सुबोध आहे त्यांचे अनेक श्लोक बोधदायी आहेत

मानवी मन हे खूप चंचल असते. म्हणून तर त्याला पाण्याची उपमा देतात. या चंचल मनाला योग्य मार्गदर्शन करुन त्याला योग्य वळण लावण्याचे काम संत रामदास आपल्या श्लोकातून करीत आहेत. वाचा तर हे श्लोक.

मनाचे श्लोक

फुकाचे मुखी बोलतां काय वेंचे ।
दिसेंदीस अभ्यंतरी गर्व सांचे ।।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारं तुझा तूंचि शोधूनि पाहें ।।१।।

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ।
मना बोलणे नीच सोशीत जावे ।।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे ।
मना सर्व लोकांसी रे नीववावे ।।२।।

जनीं सर्वसूखी असा कोण आहे ।
विचारें मना तूंचि शोधून पाहें ।।
मना त्वाचि रे पूर्वसंचीत केलें ।
तया सारिखे भोगणें प्राप्त झालें ।।३।।

सदा बोलण्यासारिखे चालता हे ।
अनेकीं सदा एक देवासि पाहे ।।
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा ।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ।।४।।

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ :-

पाठीराखा	- सोबती	क्रीडा	- खेळ
कांता	- बायको	देह	- शरीर
कल्पतरु	- स्वर्गातील एक झाड की जे आपल्या सर्व इच्छा पूर्ण करते (ही कवि-कल्पना आहे).		
कंथा	- झोळी,	फुकाचे	- फुकट, मोफत
वाचाळ	- सतत बडबडणारा	तरणे	- वाचणे, बचाव होणे.
सेवन करणे	- खाणे	जनीं	- लोकांमध्ये, जनांमध्ये
लेखा	- हिशेब,	त्वांचि	- तूच
सिध्दी	- साध्य	लेश	- कणभर
वाणी	- बोलणे,	दास	- सेवक
सोयरी	- नातलग	धारिष्ट	- धैर्य
वदावे	- बोलावे	वृक्षवल्ली	- झाडे, वेली
नीच	- नित्य,	नीववावे	- शांत करावे

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) आपला पाठीराखा कोण आहे ?

२) राणीला भीक का मागावी लागत नाही ?

३) आपण कोठे बसलो तर आपल्या इच्छा पूर्ण होतात ?

४) पक्षी कसे गात आहेत ?

५) तुकारामांनी आपल्या देहाचे भोजन कोणते, म्हटले आहे ?

६) आपल्या ठिकाणी गर्व केव्हा निर्माण होतो ?

७) स्वतः नेहमी कसे बोलावे ?

८) जगात सुखी कोणीही नाही असे संत रामदास का म्हणत आहेत ?

आ. समानार्थी शब्द लिही -

मित्र, झाड, वारा, वाणी, बायको, शरीर, काम, सेवक

इ. विरुध्दार्थी शब्द लिही -

सुख	×	मधुर	× .....
सुसंवाद	×	सुस्वर	× .....
गुण	×	सज्जन	× .....
सत्य	×	कीर्ती	× .....
सगुण	×		

ई. खालील वाकप्रचारांच्या अर्थाच्या जोड्या जुळव -

तरुन जाणे	-	बोलणे
वास	-	आस्वाद घेणे
सेवन करणे	-	बचाव होणे
संवाद साधणे	-	राहाणे

उ. अर्थातील फरक स्पष्ट कर -

पाव

वास

वाणी

अंग

अंतर

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

ऊ. चार ते पांच वाक्यात उत्तरे लिही -


१) आपण सदगुरु का केला पाहिजे ?

२) वन, पशुपक्षी यांचे संरक्षण का करावे ?

३) माणसाचे जीवन व्यर्थ केव्हा होते ?

४) सेवक केव्हा धन्य होतो ?

ए. 'न' चा वापर करुन शब्द तयार कर व शब्दाचे अर्थ लिही -



ऐ. खालील काव्यातल्या ओळींचा अर्थ स्पष्ट कर.

१. कल्पतरु तळवटी जो कोणी बैसला ।
काय वाणी त्याला सांगिजोजी ।।

२. मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावे
मना बोलणे नीच सोशीत जावे ।

ओ. 'गुरूचे महत्व' स्वतःच्या शब्दात लिही.

औ. गाळलेल्या जागा भर -

१) ..... सारखा पाठीराखा नाही.

२) पक्षी ..... राग आळवीत होते.

३) आपल्या शरीराला ..... चे भोजन असावे.

४) कृतीहीन बोलणे ..... आहे.

५) नेहमी ..... बोलावे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अं कवितेतील सुविचारांची यादी कर.

❋ उपक्रम:

१) झाडे लावा झाडे जगवा यावर आपले विचार मांड.

२) मनाचे श्लोक मिळव, चार्ट वर लिही व वर्गात प्रदर्शित कर.

३) सुविचारांचा संग्रह कर.

हे ही करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही.

१) सौष्ठव

२) निष्ठा

३) कोपिष्ठ

४) उद्योगीकरण

५) निरुपयोगी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाषाभ्यास

मात्रा लेखन

आपण आपले विचार नेहमी दोन प्रकारात व्यक्त करतो. मनात येणारे विचार जसेच्या तसे बोलून दाखविल्यास त्यास गद्य म्हणतात. आपल्या मनात येणाऱ्या वाक्यातील शब्द ठराविक क्रमाने लिहून ते सुरात किंवा चालीवर म्हणता येत असतील तर त्याला पद्य म्हणतात. पद्यात ओळीं किंवा चरण येतात त्यांना एक लय असते पद्यातील विशिष्ट रचनेला **वृत्त** किंवा **छंद** म्हणतात.

मात्रा - काव्यातील एखाद्या अक्षराचा उच्चार करण्यास जो वेळ लागतो त्याला मात्रा म्हणतात. पद्यात-हस्व अक्षराना लघु अक्षरे व दीर्घ अक्षरांना गुरु अक्षरे म्हणतात, लघु अक्षरे ◡ (अर्धचंद्राकृतीने) दर्शवितात व गुरु अक्षरे - (आडव्या रेषेने) दर्शवितात,

अ, इ, उ ऋ हे स्वर किंवा क, कि, कु, कृ

अशी स्वरयुक्त अक्षरे लघु-अक्षरे म्हणून ओळखली जातात.

आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ, हे, दीर्घ स्वर

किंवा का, की, कू , के, कै, को, कौ अशी स्वरयुक्त

अक्षरे गुरु - अक्षरे म्हणून ओळखली जातात.

मात्रा मोजताना लघु अक्षराची एक मात्रा व गुरु अक्षराच्या दोन मात्रा मोजतात.

गण - पद्यातील प्रत्येक चरणातील तीन तीन अक्षरांचे गट पाडण्यात येतात त्या गटांना गण किंवा अक्षर गण म्हणतात.

पद्याच्या एका चरणात जर शेवटी तीन अक्षरांचा गण न पडता दोन अक्षरे असतील तर लघु अक्षरा बद्दल **ल** व दीर्घ अक्षराबद्दल **ग** असे दर्शवावे.

गणांचे एकुण आठ प्रकार आहेत ते

य, र, त, न, भ, ज, स, म या नावाने ओळखले जातात प्रत्येक गणाचे लघुगुरु वरुन केलेले वर्णन लक्षात ठेवल्यास गण पाडताना व ओळखताना कठीण जात नाही.

यती -चरण वाचताना, किंवा म्हणताना मध्ये आपण ज्या शब्दानंतर थांबतो त्याला यती म्हणतात

आद्य लघु तो **य** गण गणावा

मध्य लघु तो **र** गण गणावा

अंत्य लघु तो **त** गण गणावा

सर्व लघु तो **न** गण गणावा

आद्य गुरु तो **भ** गण गणावा

मध्य गुरु तो **ज** गण गणावा

अंत्य गुरु तो **स** गण गणावा

सर्व गुरु तो **म** गण गणावा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

	गणनाम	लघुगुरु क्रमचिन्ह	लक्षण	संकेत चिन्ह	चिन्हांकित गण
१	य	⏑ – –	आद्य लघु	यमाचा	⏑ – – य मा चा
२	र	– ⏑ –	मध्य लघु	राधिका	– ⏑ – रा धि का
३	त	– – ⏑	अंत्य लघु	तारप	– – ⏑ ता रा प
४	न	⏑ ⏑ ⏑	सर्व लघु	नमन	⏑ ⏑ ⏑ न म न
५	भ	– ⏑ ⏑	आद्य गुरु	भास्कर	– भा स्क र
६	ज	⏑ – ⏑	मध्य गुरु	जनाल	⏑ – र ना स
७	स	⏑ ⏑ –	अंत्य गुरु	समरा	⏑ – स म रा
९	म	– – –	सर्व गुरु	मानावा	– – – मा ना वा

गणनाम लक्षात ठेवण्याचे सूत्र 'यरतन भजसम' खालील चरणातील गण व लघुगुरु या चिन्हांचा अभ्यास कर

चरण - सदा सर्वदा योग तूझा घडावा

लघुगुरु क्रमचिन्ह	सदास – –	र्वदायो – –	गतूझा – –	घडावा – –
गण	य	य	य	य

लघुगुरु क्रम व मात्रा

चरण - तया वनी एक तटाक तोये !

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

लघुगुरु	तयाव	नीएक	तटाक	तो	ये
क्रमचिन्ह	–	– –	–	–	–
गण	ज	त	ज	ग	ग

मात्रा	तयाव	नीएक	तटाक	तो	ये
	१२१	२२१	१२१	२	२
	४	५	४	२	२

एकूण संख्या १७

स्वाध्याय -

खालील चरणांचे गट करुन लघु-गुरु चिन्हे देऊन प्रत्येक गणाची मात्रासंख्या ओळखा व गण ओळखा.

१) मना सज्जना भक्ति पंथेचि जावे ।

२) पकड चेंडू असा वरच्या वरी ।

३) आनंदी आनंद गडे.

४) नववधू प्रिया मी बावरते.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

14. डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद

Q9W4Y5



''भारत देशातील तरुण वर्गाने शिक्षणासाठी परदेशात न जाता परदेशातील लोकांनी शिक्षणासाठी भारतात यावे. भारताच्या शिक्षण पध्दतीत असलेला प्राचीन गौरव पुन्हा स्वतंत्र भारताला मिळवून द्यावा.'' असे आवाहन करणारे तरुण पिढीला चेतना देणारे भारताचे पहिले शिक्षणमंत्री डॉ. मौलाना अबुल कलाम आझाद हे होत.

मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी मुसलमानांचे पवित्र स्थान असलेल्या मक्का या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मौलाना खैरुद्दीन व आईचे नाव अलीसा बेगम. अबुल कलाम बालपणी फिरोजखक्त या नावाने ओळखले जात पण त्यांचे खरे नाव होते मोहिउद्दिन अहमद. परंतु त्यांनी तरुणपणी मौलाना अबुल कलाम आझाद हे टोपणनाव घेतले. अबुल कलाम या शब्दांचा अर्थ 'वाचस्पती' असा होतो. हे टोपणनावच त्यांचे खरे नाव झाले. ते दोन वर्षाचे असताना त्यांचे वडील कलकत्याला आले. त्यांची मातृभाषा अरबी परंतु आझाद यांना अरबी, फार्सी, उर्दू, बंगाली तसेच हिंदी या भाषांचे चांगले ज्ञान होते. गणित, तत्वज्ञान, इस्लाम धर्म, जागतिक इतिहास इत्यादी विषयात ते पारंगत झाले. त्या काळात इंग्रजी भाषेचा प्रसार वाढत चालला होता. आधुनिक शिक्षण घेण्यासाठी इंग्रजी शिकणे आवश्यक आहे याची जाणीव होऊन त्यांनी इंग्रजी भाषेचा अभ्यास स्वतंत्रपणे सुरु केला. वयाच्या बाराव्या वर्षापासून शाळेतील ग्रंथालय व अध्ययन केंद्र ते जबाबदारीने चालवीत होते.

भारताच्या पारतंत्र्याच्या काळात इंग्रज लोक भारतातील जनतेत फूट पाडून मुसलमान नेत्यांना आपलेसे करुन घेऊन स्वातंत्र्याची चळवळ कमजोर करु इच्छित होते. आझाद यांनी इजिप्त अरबस्तान, तुर्कस्तान इत्यादी देशांना भेटी दिल्या.त्या देशांची स्थिती व भारताची स्थिती याची त्यांनी तुलना केली. परदेशातील मुसलमान हे देशाचे स्वातंत्र्य टिकविण्यासाठी किंवा देशाच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रयत्नशील होते. मग आपल्याच देशात का नाही? हा प्रश्न त्यांना सतावू लागला व ते भारतात आले त्यानी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात मुसलमानांनी सुध्दा सहभागी झाले पाहिजे असा प्रचार सुरु केला. त्यासाठी ते 'आझाद' या टोपण नावाखाली वृत्तपत्रात लेखन करु लागले.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

इ.स. १९०५ मध्ये लॉर्ड कर्झन या व्हाईसरॉयने बंगालची फाळणी करुन हिंदू-मुसलमानात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा परिणाम वेगळाच झाला. हिंदू-मुसलमान एकत्र आले. श्री शामसुंदर चक्रवर्ती यांच्यासारख्या महान क्रांतिकारकांच्या नेतृत्वाखाली बंगालच्या फाळणीला विरोध चालू झाला. तेव्हा मौलाना आझाद यांचा श्री शामसुंदर चक्रवर्ती यांच्याशी संपर्क आला. ते चळवळीकडे आकर्षित झाले आणि ते क्रांतिकारकाच्या गटाला जाऊन मिळाले. त्यांनी राष्ट्रभक्तीच्या प्रचारासाठी 'अल-हिलाल' हे उर्दू वृत्तपत्र सुरु केले. त्यांच्या लिखाणावर ब्रिटिशांनी बंदी आणली. १९१५ पासून पुन्हा अल-बलाघ नावाचे वृत्तपत्र सुरु केले. ते उत्तम वक्ते होते. त्यांनी स्वातंत्र्याच्या जनजागृतीसाठी देशभर दौरे काढले. तेव्हा इंग्रज सरकारने त्यांना तुरुंगात घातले. तुरुंगात राहून त्यांनी लोक जागृतीचे कार्य जोरात सुरू केले. त्यामुळे देशाच्या हितासाठी प्रयत्न करणारा एक विव्दान नेता अशी प्रतिमा समाजात निर्माण झाली. महात्मा गांधीचे मार्गदर्शन आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सर्व भारतीयांना इंग्रजाविरुध्द एकतेने लढण्यास एक वेगळी प्रेरणा मिळाली. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे कार्य अमूल्य होते.

भारत एकसंघ राहावा व जगात एकतेचे प्रतीक बनावा ही त्यांची मनापासूनची इच्छा होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ते भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले. त्यांचे शिक्षणाबद्दल अतिशय दूरदृष्टीचे विचार होते. स्वतंत्र भारतात ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान या तीनही क्षेत्रात भारताची प्रगती व्हावी यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा अशी त्यांची इच्छा होती. देशाच्या साहित्य, कला, आणि संस्कृतीचा विकास व्हावा यासाठी प्रौढशिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान याला त्यांनी जास्त महत्व दिले. समाजातील सर्व थरातील लोकांना शिक्षण मिळावे अशी त्यांची तळमळ होती. त्यांच्या कालावधीत संगीत कला, साहित्य याला प्रोत्साहन देण्यासाठी संगीत, नाटक अकादमी, साहित्य अकादमी, ललितकला अकादमी या तीन अकादमींची स्थापना करण्यात आली. या अकादमींमुळे विविध भाषा आणि संस्कृतींचे ज्ञान देशालाच नव्हे तर जगालाही होत आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रात केलेले कार्य आजच्या राष्ट्रीय शिक्षणाचा भक्कम पाया बनले आहे.

अबुल कलाम आझाद यांनी 'इंडिया विन्स फ्रिडम' हा आत्मचरित्रपर ग्रंथ लिहिला. त्यांनी उर्दू तसेच इंग्रजी भाषेत अनेक पुस्तके लिहिली आहेत. एक धर्मनिरपेक्ष व्यक्ती अशी त्यांची प्रतिमा होती. अशा महान व्यक्तीचा अंत २३ फेब्रुवारी १९५८ रोजी झाला. त्यांनी भारताचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी १९९२ साली भारत सरकारतर्फे भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा मरणोत्तर गौरव करण्यात आला. ११ नोव्हेंबर हा त्यांचा जन्मदिन भारतात 'राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून' साजरा केला जातो.

NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ :

प्राचीन - पूर्वीचे निरपेक्ष - कोणतीही अपेक्षा न ठेवणारा

वाचस्पती - उत्तम वक्ता, ज्ञानी. अमूल्य - ज्याची किंमत करता येता नाही असे.

पारंगत - प्रवीण, अध्ययन- शिकणे

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही.

१. भारताचे पहिले शिक्षणमंत्री कोण होते ?

२. मौलाना अबुल कलाम यांचा जन्म कोठे झाला ?

३. 'अबुल कलाम' या शब्दाचा अर्थ काय. ?

४. आझाद यांनी कोणत्या देशांनां भेटी दिल्या ?

५. बंगालची फाळणी केव्हा झाली ?

६. मौलाना अबुल कलामांची कोणती इच्छा होती ?

आ. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिही.

१. अबुल कलामानी तरुण पिढीला कोणते आवाहन केले आहे ?

२. हिंदू मुलसमानांत फूट पडू नये म्हणून अबुल कलामांनी कोणते प्रयत्न केले?

३. अबुल कलामांचे शिक्षणाबद्दलचे कोणते विचार होते?

४. संगीत, कला व साहित्याच्या विकासासाठी अबुल कलामानी कशा प्रकारे प्रोत्साहन दिले ?

इ. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द वापरुन वाक्ये पूर्ण कर.

१. अबुल कलाम लहानपणी..... या नावाने ओळखले जात.

२. ..... या व्हाईसरॉयने बंगालची फाळणी केली.

३. तुरुंगात राहून त्यानी ..... कार्य जोरात सुरु केले.

४. अबुल कलामानी ..... हा आत्मचरित्रपर ग्रंथ लिहिला.

५. १९९२ साली भारत सरकारने कलामांना ..... हा पुरस्कार दिला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

ई. खालील विशेष दिन व दिनांक यांच्या जोड्या जुळव.

१. लोकसंख्या दिन	६ जून
२. वसुंधरा दिन	८ मार्च
३. शिक्षण दिन	५ सप्टेंबर
४. पर्यावरण दिन	११ जुलै
५. शिक्षक दिन	११ नोव्हेंबर
६. महिला दिन	२२ एप्रिल

उ. उलट अर्थाचे शब्द लिही.

१. देशभक्त २. प्रगती ३. कीर्ती ४. सोय ५. प्रचार

ऊ. समानार्थी शब्द लिही.

१. गौरव २. चेतना ३. फाळणी ४. विव्दान ५. आधुनिक

❋ उपक्रम::

भारताच्या प्रगतीसाठी प्रयत्न केलेल्या महान नेत्यांची चरित्रे मिळव व वाच.

हे ही करुन पहा

खालील शब्द प्रत्येकी पाचवेळा जसेच्या तसे लिही-

१. सुज्ञ २. सामुग्री ३. सहस्त्र

४. षष्ट्यब्दीपूर्ती ५. व्यक्तिमत्व

भाषाभ्यास

वाक्यांचे प्रकार

वाक्यांचे त्यांच्या अर्थानुसार विविध प्रकार होतात

१) विधानार्थी वाक्ये :

अ) काल खुप पाऊस झाला.

आ) माझी आई छान स्वयंपाक करते.

इ) विजयचा भाऊ चांगला धावपटू आहे.

ई) मी अक्षर सुधारेन.

वरील वाक्यांत सरळ अर्थाने वेगवेगळी विधाने आहेत त्यावरुन ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते त्याला **विधानार्थी वाक्य** म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

२) होकारार्थी वाक्ये

अ) राम अभ्यास करतो.

आ) रॉबर्ट नेहमी क्रिकेट खेळतो.

इ) रेश्मा चित्र चांगली काढते.

ई) मी नियमितपणे शाळेला जातो.

वरील वाक्यांतून होकारार्थी विधाने आहेत ज्या वाक्यातून होकारार्थी विधान केलेले असते त्याला होकारार्थी वाक्य म्हणतात.

३) नकारार्थी वाक्ये

अ) तो मुलगा अभ्यास करत नाही.

आ) अभ्यासाशिवाय परीक्षेत यश मिळत नाही.

इ) तिला मेंदी लावता येत नाही.

ई) तुला लाल रंगाचे कपडे शोभत नाहीत.

वरील वाक्यांतून नकारार्थी विधाने आहेत. ज्या वाक्यातून नकारार्थी विधान केलेले असते त्याला नकारार्थी वाक्य म्हणतात.

४) आज्ञार्थी वाक्ये.

अ. खिडकी उघड.

आ. सुनिलकडून कविता पाठ करुन घे.

इ. रोज पहाटे पाच वाजता उठा.

ई. रस्त्याच्या डाव्या बाजूने चाल.

या वाक्यातून आज्ञा दिलेली आहे हे समजते त्या वाक्याला आज्ञार्थी वाक्य म्हणतात

५) प्रश्नार्थक वाक्ये

अ. तू दररोज किती तास अभ्यास करतोस?

आ. बाबा बेंगळूरहून कधी परत येणार आहेत ?

इ. तुला वाचनाची आवड आहे का ?

ई. राधाला कोणी मारलं ?

या वाक्यांतून प्रश्न विचारले आहेत ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो अशा वाक्यांना प्रश्नार्थक वाक्य असे म्हणतात

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

६) उद्‌गारार्थी वाक्ये

अ. छान ! तुम्हीच हे करु शकता !

आ. अरेरे ! किती भयानक अपघात आहे हा !

इ. अबब ! केवढी गर्दी आहे इथे !

ई. व्वा ! जिंकलो आम्ही !

या वाक्यातून कौतुक आश्चर्य. आनंद दुःख अशा भावना व्यक्त झाल्या आहेत ज्या वाक्यांद्वारे मनातील विविध प्रकारच्या भावना प्रकट होतात, अशा वाक्याना उद्‌गारार्थी वाक्ये म्हणतात

७) विधानार्थी अथवा इच्छादर्शक वाक्ये.

अ. आम्ही वडिलधाऱ्यांची आज्ञा पाळावी.

आ. मला परीक्षेत पहिला क्रमांक मिळाला.

इ. आधी मुलाना प्रसाद द्यावा.

ई. उद्या पाऊस पडेल.

वरील वाक्यात क्रियापदाच्या रुपावरुन कर्तव्य, शक्यता, योग्यता, इच्छा इत्यादी गोष्टींचा बोध होतो अशा वाक्याना विध्यर्थी किंवा इच्छादर्शक वाक्ये म्हणतात.



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

15. तीन प्रश्न

लेखिका : डॉ. चित्रा नाईक

T7H1U8




उत्तर येत नाही ? बेवकूफ। उडवा मुंडकं त्याचं. त्याचं देखील। हया सगळया मंत्र्यांचा, सरदारांचा शिरच्छेद करा.
प्रधानजी, प्रश्नांची उत्तरे आणा तुम्हीच शोधा नाही तर मृत्यूला तयार राहा.
जशी आज्ञा, महाराज. प्रश्नांची उत्तरं मी समाधी लावून मिळवीन. मला एक दिवसाचा अवधी द्या
परमेश्वरा, बाबब मला आज त्या प्रश्नांची उत्तरं सापडली नाहीत, तर हा दुष्ट राजा मला ठार करील. ह्या संकटातून सुटायला काय करू ? काय करू देवा ?
महाराज, आपली प्रकृती ठीक नाही का ?
बेटा, मेंढपाळा, राजा मला उद्या फाशी देईल. कारण त्याच्या तीन प्रश्नांची उत्तरं मला सापडली नाहीत. त्या चिंतेने मला ग्रासले आहे.
महाराज, कोणते ते तीन प्रश्न ? त्याची उत्तरे मला नक्की सापडतील.
ते ३ प्रश्न: १. ह्या देशाचा मध्यबिंदू कोणता ? २. आकाशात किती चांदण्या आहेत ? ३. देवाधिदेवाचे काम काय असते ?
महाराज, आपण मला दरबारात न्या. मला उत्तरं तिथंच देता येतील.
महाराज, प्रश्नांची उत्तरे आणली आहेत माझ्या ह्या मेंढपाळ, मित्र ती उत्तरे देईल.


राजाने पहिला प्रश्न विचारला: मेंढपाळाने आपली काठी जमिनीवर आपटून तिचे दोन तोपले: तो म्हणाला,
राज्याचा मध्यबिंदू हाच तो नाही हे तुम्हीच सिद्ध करा:
राजा निरुत्तर झाला: त्याने दुसरा प्रश्न विचारलाच खोचलेल्या मेंढ्याचे कातडे जमिनीवर फेकून मेंढपाळ म्हणाला,
ह्या मेंढ्याच्या कातडयात जितके केस आहेत, तेवढीच बरोबर चांदण्यांची संख्या आहे. आपण ती मोजून पाहावी.
ठीक आहे तिसरा प्रश्न: देवाधिदेवाचे काम काय?
महाराज, ह्या प्रश्नाचे उत्तर देण्याआधी एक विधी करावा लागेल.
कोणता विधी?
मला राजवस्त्रे घालायला द्या: आपला मुकुट माझ्या मस्तकी ठेवा: मग उत्तर सांगडेल:
ठीक आहे: तुमाला आत नेऊन राजवस्त्रे घालून आणा.


आता आपला मुकुट मला द्याला आपल्या सिंहासनावर मला बसू द्या.
ठीक आहे. आता तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर दे!
सैनिकहो! पकडा ह्या दुष्ट राजाला! युद्धावर चढवा त्याला. त्याच्या अरेरावीमुळे अनेक निरपराध जीव बळी गेले आहेत.
चतुर मेंढपाळाच्या न्यायबुद्धीने सर्वांना आनंदित केले. तो राजाला म्हणाला,
मूर्ख आणि निर्दय राजा, हे तिसऱ्या प्रश्नाचं उत्तर हे. देवाधिदेवाचं काम असले न्याय देण्याचं, निरपराध जिवांचे संरक्षण करायचे आणि विवेकाने अधिकार वापरायचा.
आजपासून आपणच आमचे महाराज! न्यायी आणि विवेकशील व्यक्तीच राजाधिराज होऊ शकते.
नवीन महाराजांचा विजय असो.

नवीन शब्दार्थ -

अरेरावी - उद्धटपणा
न्यायी - योग्य प्रकारे वागणारा
इभ्रत - इज्जत
विवेकशील - विचार करणारा
शिरच्छेद करणे डोके उडविणे

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिही

१. राजधानीमध्ये कोण आला होता ?
२. प्रवाशाचा पहिला प्रश्न कोणता ?
३. प्रवाशाने दुसरा प्रश्न कोणता विचारला ?
४. प्रवाशाचा तिसरा प्रश्न कोणता ?
५. उत्तर न देणाऱ्यास राजाने कोणती शिक्षा सुनावली?
६. प्रधानाने मेंढपाळाला काय सांगितले ?
७. प्रधानाने राजाकडे किती अवधी मागितला?
८. दरबारातील लोकांनी कोणती घोषणा दिली ?
९. राजाला कोणी धडा शिकविला ?

आ. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

१. मेंढपाळाने पहिल्या प्रश्नाचे उत्तर काय दिले ?
२. मेंढपाळाने दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर कसे दिले ?
३. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्याआधी मेंढपाळाने राजाला काय करण्यास सांगितले?
४. राजवस्त्रे धारण केल्यानंतर मेंढपाळाने सैनिकांना कोणती आज्ञा दिली ?
५. मेंढपाळाने देवाधिदेवांचे काम कसे दाखवून दिले ?

इ. कोणी कोणास म्हटले ?

१. ''महाराज, कोणते ते तीन प्रश्न ? त्याची उत्तरे मला नक्की सापडतील''
२. ''राज्याचा मध्यबिंदू हाच तो, नाही हे तुम्हीच सिद्ध करा.''
३. ''ठीक आहे, ह्याला आत नेऊन राजवस्त्रे घालून आण.''
४. ''जशी आज्ञा महाराज, प्रश्नांची उत्तरे मी समाधी लावून मिळवीन. मला एक दिवसाचा अवधी द्या.''

NOT TO BE @KTBS REPUBLISHED

ई. चित्रातील संवादाप्रमाणे संवादलेखन कर -



उ. खालील शब्दांचा तुझ्या वाक्यात उपयोग कर -

१. अरेरावी
२. निर्भीड
३. न्यायबुध्दी
४. विधी

भाषाभ्यास

संधी

आतापर्यंत तुम्ही स्वरसंधी, व्यंजनसंधी हे संधीचे दोन प्रकार शिकलात. आता संधीचा महत्वाचा तिसरा प्रकार विसर्ग संधी शिकू.

विसर्ग संधी

१) खालील शब्दांचे संधी वाच.

मनः + रथ = मनोरथ

अधः + वदन = अधोवदन

यशः + धन = यशोधन

नमः + नमः = नमोनमः

मनः + रंजन = मनोरंजन

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

नियम - विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर व पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा 'उ' होतो व तो मागील 'अ' मध्ये मिळून त्याचा 'ओ' होतो.

उदाहरणार्थ -

तपः + धन = तपोधन

मनः + राज्य = मनोराज्य

मनः + भाव = मनोभाव

वयः + वृध्द = वयोवृध्द

२) खालील शब्दांचे संधी वाचः

निः	+	अंतर	=	नि	+	र	+	अंतर	=	निरंतर
दुः	+	जन	=	दु	+	र	+	जन	=	दुर्जन
बहि	+	रंग	=	बहि	+	र	+	रंग	=	बहिरंग
बहि	+	गोल	=	बहि	+	र	+	गोल	=	बहिर्गोल
धनु	+	विद्या	=	धनु	+	र	+	विद्या	=	धनुर्विद्या

नियम - विसर्गाच्या मागे अ, आ, खेरीज कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा 'र' होऊन संधी होतो.

उदाहरणार्थ - दुः + आत्मा = दुरात्मा

दुः	+	जन	=	दुर्जन
निः	+	विकार	=	निर्विकार
निः	+	इच्छा	=	निरिच्छा

३) खालील शब्दांचे संधी वाच

अधः + पतन = अधःपतन

अंतः + करण = अंतःकरण

तेजः + पुंज = तेजःपुंज

प्रातः + काल = प्रातःकाल

नियम - विसर्गाच्या मागे 'अ' हा स्वर आला आहे व विसर्गाच्या पुढे क ख प फ यां पैकी एखादे व्यंजन आले तर विसर्गात कोणताही बदल होत नाही विसर्ग तसाच कायम राहतो.

मात्र विसर्गाच्या पुढे दुसरा स्वर आला तर तो विसर्ग लोप पावतो.

उदाहरणार्थ - १) इतः + उतर = इतउत्तर

२) अतः + एव = अतएव

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

४) खालील शब्दांचे संधी वाच

दु: + काळ = दुष्काळ

नि: + पाप = निष्पाप

नि: + कारण = निष्कारण

दु: + कृत्य = दुष्कृत्य

नियम - विसर्गाच्या मागे 'इ' किंवा 'उ' हा स्वर असून क्, ख्, प्, फ् या पैकी कोणताहा वर्ण आल्यास विसर्गाचा ष होतो.

उदाहरणार्थ - दु: + कीर्ती = दुष्कीर्ती

दु: + परिणाम = दुष्परिणाम

नि: + काम = निष्काम

नि: + फळ = निष्फळ

५) खालील शब्दांचे संधी वाच -

भा: + कर = भास्कर (भा + स् + कर)

नम: + कार = नमस्कार (नम + स् + कार)

नियम - विसर्गापुढे 'कर' व 'कार' ही रुपे आल्यास विसर्गाचा 'स' होतो. उदाहरणार्थ - तिर: + कार = तिरस्कार

यश: + कर = यशस्कर

पुर: + कार = पुरस्कार

श्रेय: + कर = श्रेयस्कर

६) खालील शब्दांचे संधी वाच

नि: + चल = निश्चल

मन: + ताप = मनस्ताप

नियम विसर्गाच्या पुढे च्, छ्, आल्यास विसर्गाचा श होतो तसेच त्, थ् आल्यास स. होतो.

उदाहरणार्थ

दु: + चिन्ह = दुश्चिन्ह

नि: + चय = निश्चय

नि: + तेज = निस्तेज

अध: + तल = अधस्तल



@KTPS NOT TO BE REPUBLISHED

16. क्षणात जिंकीन



नारायण सुर्वे - (१९२६ - २०१०) कामगार आणि दलित यांची सुखदुःखे चित्रित करणारे नामवंत कवी. 'ऐसा गा मी ब्रह्म', 'माझे विद्यापीठ', 'जाहीरनामा' आणि 'सनद' हे त्यांचे काव्यसंग्रह.

(मातृभूमीवरील असीम भक्ती व प्रेम तसेच स्वभाषा, स्वदेश याविषयींचा जाज्वल्य अभिमान या प्रस्तुत कवितेतून व्यक्त होत आहे.)

माझ्या मायदेशी यावेच सर्वांनी
फुगडया घालाव्या फुला तारकांनी ।।
मेघानेही यावे डुलत झुलत
विजेनेही यावे लवत फुलत ।।

नटली नगरी रंगाने गडद
पिवळ्या शेतांची लावून हळद ।।
निळ्याभोर पानी चांदण्यांचा चारा
सह्याद्रीचा मोर उभारी पिसारा ।।

हिरव्या पक्ष्यांनो फुलवा ही बाग
भूपाळीत ओवा मालकंस राग ।।
अगा सूर्यदेवा स्पर्श करा येथे
ऐश्या भूमीपुढे नमवावे माथे ।।

ज्ञानीयांची कुणी काढा बरे तीट
मराठीचा थाटा संसार हो नीट ।।
अमृताते पुन्हा पैजा मी लावीन
थोर भल्या भल्या क्षणात जिंकीन ।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

भूपाळी - भूप रागातील सकाळी म्हणावयाचे गीत
मायदेश - स्वतःचा देश
मालकंस - संगीतातील एक राग
मेघ - ढग
माथे - डोकं, मस्तक
पैजा - स्पर्धा, प्रतिज्ञा
तीट - सुंदर वस्तूला लावलेला काजळाचा ठिपका
नमविणे - पराभव करणे, झुकविणे

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तर लिही -

१. मायदेशी फुगड्या घालत कोण आले आहे?
२. मेघाने कसे यावे?
३. लवत फुलत कोणी यावे?
४. हळद कोणी लावलेली आहे?
५. भूपाळीत कोणता राग आळविण्यास कवीने सांगितले आहे?
६. माथे कोठे नमवावे असे कवी म्हणतो?
७. कवी कोणाची दृष्ट काढण्यास सांगत आहे?

आ. तीन ते चार वाक्यात उत्तरे लिही.

१. माझा मराठाचि बोलु कवतिके. ।
परि अमृतातेही पैजेसी जिंके
या पदचरणांचा अर्थ तुझ्या शब्दात लिही.

इ. जोड्या जुळवा :

१. फुगडया घालाव्या	अ) डुलत डुलत
२. मेघांनी यावे	आ) लावून हळद
३. विजेने यावे	इ) मालकंस राग
४. पिवळी शेते	ई) लवत फुलत
५. भूपाळीत ओवा	उ) फुलातारकांनी

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

ई. अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

१) माथा टेकणे　　२) तीट लावणे　　३) पैज लावणे

उ. विरुध्द अर्थी शब्द लिही.

१. मायदेश × .....　　२. अमृत × .....

३. प्राचीन × .....　　४. फुलणे × .....

५. जिंकणे × .....

ऊ. कवितेतील कविकल्पना शोधून लिही.

नमुना : - हिरव्या पक्ष्यांनो

१.

२.

३.

४.

ए. शिक्षकांच्या मदतीने खालील शब्दकोडे सोडव

1		2	■	3	4
	■				
6	7		■	■	
■		■	8		
9		■		■	■
10		■	11		

आडवे शब्द

१. नभ

३. नहर, कालवा

५. समशेर, वीराचे एक शस्त्र

६. ठळक, गडद

उभे शब्द

१. सुरुवात

२. शंभर

३. बासरी

४. शेंगांच्या वरचा भाग, कवच

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

८. प्रवास
९. वाया, वायफळ
१०. ही एका हाताने वाजत नाही
११. युध्द, समर

७. आरोळी, वाघाचे ओरडणे
१. निस्तेज, सुकलेला
९. चालते व्हा या अर्थी वापरलेला शब्द

*** उपक्रम :**

१) माझा देश महान या विषयावर १० ओळी लिही.

हे ही करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही

१. आत्यंतिक
२. त्र्यंबक
३. निर्भत्सना
४. मूल्यवान
५. बलिष्ठ

भाषाभ्यास

विभक्ती

मागील इयतेत तू विभक्ती प्रत्ययाबद्दल थोडे शिकलास आता आपण विभक्ती प्रत्ययांचा वापर, नाम व सर्वनामाशी कसा होतो ते पाहू त्यापूर्वी मागील इयत्तेत शिकलेल्या कांही व्याख्यांची उजळणी करु.

१. वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध दर्शविण्यासाठी नाम किंवा सर्वनामाच्या रुपात जो बदल केला जातो त्या बदलाला 'विभक्ती' असे म्हणतात.
२. वाक्यात येणाऱ्या शब्दांचा क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असतो त्याला 'कारक' असे म्हणतात.
३. वाक्यात येणाऱ्या नाम किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो त्याला 'कारक संबंध' असे म्हणतात.
४. कारक संबंधातून प्रकट होणाऱ्या अर्थाला 'कारकार्थ' असे म्हणतात.
५. क्रियापदाशिवाय नामाचा इतर शब्दांशी असलेल्या संबंधांला 'उपपद संबंध' म्हणतात.
६. उपपद संबंधातून प्रकट होणाऱ्या अर्थाला 'उपपदार्थ' असे म्हणतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

खालील तक्ता पहा

कारक	विभक्ती	विभक्ती प्रत्यय	
		एकवचन	अनेकवचन
१. कर्ता	प्रथमा		
२. कर्म	द्वितीया	स,ला,ते.	स,ला,ना,ते.
३. करण	तृतीया	ने,ए,शी	नी,शी,इ,ही
४. संप्रदान	चतुर्थी	स.ला.ते.	स.ला.ना.ते.
५. अपादान	पंचमी	ऊन, हून	ऊन, हून
६. संबंध	षष्ठी	चा,ची,चे	चे,च्या,ची.
७. अधिकरण	सप्तमी	त,ई,आ,	
८. हाक मारणे	संबोधन	-	नो.

'मी' या सर्वनामाला विभक्ती प्रत्यय लावून होणारी रूपे.

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	मी	आम्ही
द्वितीया	मला	आम्हाला
तृतीया	मी	आम्ही
चतुर्थी	मला	आम्हाला
पंचमी	माझ्याहून, मजहून	आम्हाहून, आमच्याहून,
षष्ठी	माझा, माझी, माझे	आमचा, आमची, आमचे
सप्तमी	माझ्यात	आम्हात, आमच्यात

'तू' या सर्वनामाला विभक्ती प्रत्यय लावून होणारी रूपे

विभक्ती	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	तू	तुम्ही
द्वितीया	तुला	तुम्हास, तुम्हाला
तृतीया	तू	तुम्ही, तुम्हांशी
चतुर्थी	तुला	तुम्हास, तुम्हाला
पंचमी	तुझ्याहून, तुजहून	तुम्हांहून, तुमच्याहून
षष्ठी	तुझा, तुझी, तुझे	तुमचा, तुमची, तुमचे
सप्तमी	तुझ्यात	तुम्हात, तुमच्यांत

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

विभक्तीचे प्रत्यय व घर या नामाची रूपे.

	एकवचन		अनेकवचन	
विभक्ती	प्रत्यय	नामाची रूपे	प्रत्यय	नामाची रुपे
प्रथमा	-	घर		-
द्वितीया	स,ला,ते	घरास, घराला	स,ला,ना,ते	घरास, घराला, घराना
तृतीया	ने,ए,शी	घराने, घरे, घराशी	नी,ही,ई,शी	घरांनी, घरी, घराशी
चतुर्थी	स,ला, ते	घरास, घराला	स,ला,ना,ते	घरास, घराला, घराना
पंचमी	ऊन, हून	घरून, घराहून	ऊन, हून	घरुन, घराहून
षष्ठी	चा,ची,चे	घराचा, घराची,	चे,च्या,ची	घरांचे, घरांच्या, घरांची
			घराचे	
सप्तमी	त,ई,आ	घरात,	घरी	त.ई.आ. घरात. घरी
संबोधन	नो	घरा	नो	घरानो

प्रत्ययावरुन विभक्ती ओळखणे

उदाहरण	मूळ शब्द	प्रत्यय	विभक्ती	वचन
पुस्तक	पुस्तक		प्रथमा	एकवचन
वहीला	वही	ला	द्वितीया	एकवचन
शाळेने	शाळा	ने	तृतीया	एकवचन
गावाहून	गाव	हून	पंचमी	एकवचन
तुमचा	तू	चा	षष्ठी	अनेकवचन
कार्यालयात	कार्यालय	त	सप्तमी	एकवचन
माइयात	मी	त	सप्तमी	एकवचन
मुलांनो	मूल	नो	संबोधन	अनेकवचन

©KSRS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय- १. मूल, शहर या नामांचा वापर करुन विभक्ती प्रत्ययांची विविध रुपे लिही.

२. खालील शब्दांच्या विभक्ती लिही.

१) रामाची २) आकाशात ३) कवितांची ४) मित्रहो

५) विजापूरहून ६) पुढाऱ्यांनी ७) घरातून ९) पायाला



17. आमची गोव्याची सहल

R1T8G1

कु कावेरी यादव
मठ गल्ली,
संकेश्वर, ता. हुक्केरी
दि. १५-५-२०१२

प्रिय दादाला,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष.

तू मला परीक्षा संपताच बेंगळूरला ये म्हणाला होतास परंतु मी आले नाही म्हणून रागावू नकोस. मी तिकडे न येण्याचे कारण म्हणजे मी बाबांची परवानगी घेऊन गोव्याला जाऊन आले. तू म्हणशील असं कसं काय?


आमची परीक्षा २९ मार्चला संपली. त्याच दिवशी मुख्याध्यापकांनी , शिक्षक आणि पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांची सभा घेतली. त्यात त्यांनी ११ एप्रिल ते १३ एप्रिल या अवधीत गोव्याला सहलीला जाण्याचा प्रस्ताव ठेवला. एप्रिल-मे महिन्याचे दिवस म्हणजे सहलीचे नव्हेत. उन्हाळ्याचे दिवस, त्यात आणि गोव्याला? आमचे चेहरे पाहून मुख्याध्यापकांनी आम्हाला सांगितलं की तुमच्या मनातील शंकाकुशंका बाजूला ठेवा. तुम्ही यायची तयारी करा. ही सहल तुम्हाला चांगले शिकल्याची, पाहिल्याची आजन्म आठवण ठेवण्यासारखी होईल. त्यांनी प्रवासाची रुपरेषा आणि खर्चाची रक्कम सांगितली. घरी येऊन बाबांना सहलीबाबत सांगितलं. आश्चर्य म्हणजे बाबांनी काहीही कुरबुर न करता परवानगी आणि लागणारी रक्कम दिली.



११ एप्रिल रोजी सकाळी साडेसहाला शिक्षक व विद्यार्थी असे ११० जण दोन बसेसमधून निघालो. वाटेत बेळगाव, खानापूर, लोंढा, रामनगर, अनमोड ही गावं लागली. अनमोडहून गोव्यापर्यंतचा घाट, दाट जंगल, घाटात एका बाजूला खोल दरी व दुसऱ्या बाजूला उंच डोंगर यांची आम्हाला खूप भीती वाटली.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

गोव्याच्या हद्दीत प्रवेश केल्यावर पहिले गाव लागले मोलम. तिथून आम्ही पहिले ठिकाण पहायला गेलो ते म्हणजे दूधसागर. नांव एकून मला मजा वाटली. तिथे पोहोचल्यावर आम्ही पहातो तर काय, उंच कड्यावरून कोसळणारा दुधासारखा पांढऱ्याशुभ्र पाण्याचा धबधबा रोडावल्यासारखा दिसत होता. आजूबाजूला दाट वनराई, भयावह मोठे काळे खडक आणि त्या खडकांवरुन कोसळणाऱ्या जलधारा पाहून आम्ही मंत्रमुग्ध झालो. तेथून आम्ही तांबडीसूर्ल या गावी आतो. या ठिकाणी हेमाडपंथी बांधणीचे प्राचीन शिवमंदिर आहे. दाट वनराईतील शांत प्रसन्न वातावरणातील मंदिर पाहून आम्ही गोव्यातील मध्यवर्ती शहर फोंडा येथे पोहोचलो. या शहराच्या जवळ असलेल्या श्री नागेश देवस्थानानजीक आमची रहायची सोय मुख्याध्यापकांनी आधीच केली होती. तिथे आमचे साहित्य ठेवून ताजेतवाने होऊन आम्ही जवळची मंदिरे पहायला बाहेर पडलो. रस्त्याच्या दुतर्फा नारळाची झाडं, उन्हाळी भातानं हिरवीगार झालेली शेती, झाडीत लपलेली कौलारु घरं पाहात आम्ही श्री रामनाथ, श्री महालक्ष्मी या देवतांची मंदिरे पाहून परत आलो. त्या रात्री श्री नागेश देवस्थानात रात्रीची पालखीसेवा व आरती पाहिली. हे सारे आम्हाला नवीन होते. तेथील लोकांनी आम्हाला सांगितते की तेथे चैत्री आहे. आम्हाला ते समजलं नाही. तेव्हा एकाने सांगितले की चैत्र महिन्यात विशेष पूजा करतात त्याला 'चैत्री' म्हणतात या उत्सवाला तसेच इतर उत्सवांना दूरदूरचे भक्तगण मुद्दाम येतात.






रात्रीचे जेवण करून मुक्कामाच्या ठिकाणी आल्यावर मुख्याध्यापकांनी गोव्याची थोडक्यात माहिती सांगितली. गोवा हे पूर्वी पोर्तुगीजांच्या तावडीत होते. हे १९ डिसेंबर १९६१ रोजी स्वतंत्र होऊन भारतात समाविष्ट झाले. पणजी हे शहर याची राजधानी असून मडगाव, म्हापसा, साखळी ही काही प्रमुख शहरे आहेत.

© KTES NOT TO BE REPUBLISHED

वास्को हे एक मोठं बंदर असून, येथून मॅंगनीजची निर्यात मोठ्या प्रमाणात होते.



दुसऱ्या दिवशी आम्ही मंगेशी येथील श्री मंगेश, मार्दोळ येथील म्हालसा नारायणी तसेच इतर प्रसिध्द मंदिरे पाहिली. म्हालसा नारायणी मंदिरासमोरील भारतातील सर्वात मोठ्या १२.५ मीटर उंचीच्या समईने आमचे लक्ष वेधून घेतले.

ओल्ड गोवा येथील प्रसिध्द सेंट फ्रान्सिस झेवियर चर्च आणि तिथून जवळ असलेले ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय पाहून दोनापॉल येथील इंडियन ओशियनोग्राफीक सेंटरला भेट दिली. येथे आत जाण्यासाठी आधी परवानगी घ्यावी लागते. येथे आम्हाला स्लाईड्स व चित्रफितीव्दारे वेगवेगळ्या प्रकारची जहाजे, त्यांची आतील रचना, समुद्रातील जैविक विश्वाची माहिती दाखविली. त्यामुळे आमच्या ज्ञानात अतिशय चांगली भर पडली. तेथून बाहेर आल्यावर वाटेत आम्हाला मीठ तयार करायची पारंपारिक पध्दत पाहायला मिळाली. तेथून आम्ही मिरामार येथे आलो. या ठिकाणी मांडवी नदी अरबी समुद्राला मिळते. मी समुद्र पहिल्यांदाच पाहिला, समुद्राच्या मोठ्या लाटा, किनाऱ्यावर पसरलेली स्वच्छ मऊ वाळू, मस्त वारा आणि तेथून दिसणारा सुर्यास्त, हे सारं अतिशय सुंदर वाटलं. विद्युत रोषणाईने सुशोभित असलेले पणजी शहर पहात मुक्कामाच्या ठिकाणी आलो. त्या रात्री आम्ही तेथे 'दशावतारी' हा कोकणात चालणारा नाट्यप्रकार पाहिला.

तिसऱ्या दिवशी आम्ही बोंडला अभयारण्याला गेलो. तिथे सागवान, नाणा जांभूळ, शिसम, इत्यादी. प्रचंड वृक्ष आहेत. तिथे आम्हाला ससे, मोर, साळुंद्री, पिसोळी, मुंगुस, घोरपड, हरीण, बिबटा वाघ, पट्टेरी वाघ इत्यादी प्राणी पहाण्यास मिळाले. तेथील सर्पोद्यानात नाग, धामीण, घोणस, इत्यादी प्रकारचे साप पाहिले. तेरा फूट लांबीचा अजगर पाहून आम्ही भीतीने गारठून गेलो. तेथून आमची बस एका बागेसमोर थांबविली. बाहेर फलकावर लिहिलं होतं 'मसाल्याची बाग' आम्ही बागेत गेलो. बागेच्या मालकांनी आमचं स्वागत करुन आम्हाला बागेतील लवंग, जायफळ, मिरी, वेलदोडे इत्यादी मसाल्याच्या पदार्थाची रोपे तसेच फणस, नीरफणस, भिरंड, काजू, नारळ, सुपारी, अननस यांची झाडे दाखवून त्यांची माहिती दिली. अननस कसे लागतात हे पहावयास मिळाले. तेथे आम्हा सर्वाना त्यांनी कोकम सरबत दिलं. ते पिऊन आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो. गोव्यातील सुंदर मंदिरे, त्यांच्याभोवतालचा स्वच्छ परिसर, मंदिरानजिकची तळी, हंड्या-झुंबरानी सजलेले सभामंडप, प्रसन्न पवित्र गाभारा, सुंदर शांत आणि मोठे चर्च, समुद्र किनारा हे सगळे नजरेसमोर होते. सकाळच्या न्याहरीसाठी पावभाजी आणि जेवणातील भातआमटी, सोलकढी, गऱ्यांचे पापड, लोणचे, भाजी यांचे साधे जेवण. त्याची चवच वेगळी होती. स्वच्छ रस्ते, आनंददायक शांत

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

वातावरण, सहाय्य करण्याची मनोभावना असलेले लोक आणि कोंकणी भाषेतील गोडवा हे आठवत आम्ही संकेश्वरला केव्हा येऊन पोहोचलो ते समजले नाही.

इकडे आजोबा, आई, बाबा, प्राजक्तादीदी सगळे ठीक आहेत. सोन्या आणि अनू तुझी आठवण काढतात. तू सुध्दा एकदा गोवा पाहून ये.

कळावे
तुझी लाडकी बहीण
कावेरी

वैजनाथ यादव
बी-४ श्री अपार्टमेंट
चौथा रस्ता, जयनगर, II स्टेज
बेंगळूर.

नवीन शब्दार्थ :

शंका कुशंका - बऱ्या वाईट विचारांची भीती अथवा संशय
आजन्म - जन्मभर, जन्मापासून, भयावह - भीतीदायक
स्लाईड्स - लहान वस्तू पडद्यावर मोठी दर्शविण्यासाठी वापरली जाणारी काच
घाट - डोंगरावरुन जाणारा वळणावळणाचा रस्ता
प्रस्ताव - विचार, मंत्रमुग्ध होणे - मोहित होणे, वनराई - दाट झाडी

वाकप्रचार :

चुळबुळ सुरु होणे - उतावळेपणा करणे.
कुरबुर करणे - असंतोष दाखविणे.
मंत्रमुग्ध होणे - आश्चर्याने तोंडातून शब्द न निघणे.
नजरेत साठविणे - डोळ्याने पाहून आपल्या लक्षात ठेवणे.
भीतीने गारठणे - अतिशय घाबरणे.

टीप :

नीरफणस : कोकणात व घाटमाथ्यावर आढळणारे एक फणसाच्या जातीचे फळ.
भिरंड : सोल तयार करण्यासाठी वापरले जाणारे आंबट फळ
कोकम : भिरंडाचा आंबट रस, आमसूलाचे रस
साळूंद्री : अंगावर काटे असणारा एक प्राणी (साळ, साळिंद्र)
पिसोळी : मुंगुसाच्या आकाराचा, शेवाळी रंगाचा मऊ केस असलेला प्राणी.
दशावतारी : कोकणात चालणाऱ्या पारंपारिक पौराणिक नाटकांचा प्रकार.
हेमाडपंथी : हेमाडपंत यांच्या स्थापत्यशास्त्रानुसार बांधकामाची पध्द्त.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

१. मुख्याध्यापकांनी मुलांसमोर व शिक्षकांसमोर कोणता प्रस्ताव ठेवला?

२. कावेरीला आश्चर्य का वाटले?

३. तांबडी सुर्ला या ठिकाणी सर्वांनी काय पाहिले?

४. चैत्री म्हणजे काय?

५. मोठ्या समईची उंची किती आहे?

६. मांडवी नदी समुद्राला कोठे मिळते?

आ. खालील रिकाम्या जागा भरा :

१. कावेरीची परीक्षा संपताच ..... येथे सहल जाणार होती.

२. गोव्याच्या हद्दीत लागलेले पहिले गाव .....

३. ..... हे गोव्यातील मध्यवर्ती शहर आहे.

४. कोकणात ..... हा नाट्यप्रकार पहायला मिळतो.

५. गोव्याची मुख्य भाषा ..... ही आहे.

६. ओल्ड गोवा येथे ..... हे प्रसिध्द चर्च आहे.

इ. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिही.

१. मुले मंत्रमुग्ध का झाली ?

२. दोनापॉल येथे विद्यार्थ्यांना काय दाखविले ?

३. अभयारण्यात विद्यार्थ्यांनी कोणकोणते प्राणी पाहिले ?

४. मसाल्याच्या बागेत विद्यार्थ्यांना काय दाखविले ?

५. गोव्यातील देवळांचे वैशिष्टय कोणते ?

ई. खालील शब्दांचे प्रत्येकी दोन अर्थ होतात. ते अर्थ जाणून घेऊन त्यांचा वाक्यात उपयोग कर.

उदा : घाट - डोंगरावरुन जाणारा वळणावळणाचा रस्ता.

आमची गाडी **घाटात** हळू जात होती.

घाट - एखादी गुप्त योजना

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

संगोळळी रायण्णाने इंग्रजांच्या कचेरीवर हल्ला करण्याचा **घाट** घातला.

१. शिला, शीला २. सुर - सूर ३. पाट - पाट

४. पाणि - पाणी ५. सूत - सुत ६. शिर - शीर

उ. खाली कांही वाकप्रचार आणि त्यांचे अर्थ दिले आहेत ते समजून घेऊन वाक् प्रचारांचा वाक्यात उपयोग कर.

१. अभिवादन करणे - नमस्कार करणे.

२. आकाश फाटणे - चारी बाजूंनी संकटे येणे.

३. उत्तेजन देणे - प्रोत्साहन देणे.

४. गळ घालणे - अतिशय आग्रह करणे, खूप विनंती करणे.

५. दडी मारणे - लपून बसणे

६. धावा करणे - संकट समयी मदतीला येण्यासाठी प्रार्थना करणे.

७. शब्द झेलणे - आज्ञा पाळणे.

हे ही करून पहा.

खालील शब्द प्रत्येकी पाचवेळा जसेच्यातसे लिही-

१. ठेवून २. नवीनता ३. तादात्म्य

४. निरुद्योगी ५. राजाभाऊ

भाषाभ्यास

विभक्ती विषयी आणखी थोड़े.

तुम्हाला माहीत आहे की आमच्या नेहमीच्या बोलण्यात अनेक वाक्ये येतात त्या वाक्यात सर्वात जास्त महत्व असतं ते क्रियापदाला कारण क्रियापदाशिवाय वाक्य पूर्ण होत नाही. त्यावरुन आपण असे म्हणू शकतो की वाक्यातील इतर शब्दांचा क्रियापदाशी प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष सबंध असतो. खालील वाक्य वाच

'आईने मला काल दुपारी घरात खायला पेढा दिला.' या वाक्यात 'दिला' हे क्रियापद त्याचा इतर शब्दांशी संबंध पाहू

कोणी दिला? - आईने

कोणाला दिला ? - मला

केव्हा दिला? - काल

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कोठे दिला? - घरात

कशासाठी दिला ? - खायला

काय दिला ? - पेढा

यावरुन 'दिला' या क्रियापदाशी वाक्यातील प्रत्येक शब्दाचा संबंध आहे हे दिसून येते.

आता हे दुसरे वाक्य वाच

'माझी ताई शेजारच्या कमलला नेहमी गणिते सोडवून देते' या वाक्यात 'देते' हे क्रियापद त्याचा इतर शब्दांशी संबंध पाहू

कोणाला देते ? कमलला. कोणाची ताई देते ? - माझी

केव्हा देते ? नेहमी. कुठली कमल देते ? - शेजारची

कशी देते ? सोडवून. काय सोडवून देते ? - गणिते

कोण देते ? ताई.

या वाक्यात ताई, कमलला, नेहमी, सोडवून या चार शब्दांचा 'देते' या क्रियापदाशी प्रत्यक्ष संबंध आहे.

माझी, शेजारची, गणिते यांचा संबंध ताई, कमल, सोडविते. यांच्याशी आहे. व ताई, कमल, सोडविते यांचा संबंध देते याच्याशी आहे म्हणजेच माझी, शेजारची, गणिते यांचा अप्रत्यक्ष संबंध क्रियापदाशी आहे.

- वाक्यात येणा-या नाम किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो त्याला 'कारक संबंध' असे म्हणतात त्यातून प्रकट होणा-या अर्थास कारकार्थ असे म्हणतात.

क्रियापदाशिवाय नामाचा इतर शब्दांशी असलेल्या संबंधाला उपपद संबंध असे म्हणतात.

वाक्यात येणा-या शब्दांचा क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असतो त्याला 'कारक' असे म्हणतात.

विभक्ती -

आपण सुरवातीला एक वाक्य वाचले ते म्हणजे

''आईने, मला काल दुपारी घरात खायला पेढा दिला.''

यात आलेल्या प्रत्येक शब्दाचे मूळ शब्द पाहिल्यास

आईने - आई मला - मी दुपारी - दुपार

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

घरात - घर खायला - खाणे दिला - देणे

मूळ शब्द वापरल्यास वाक्य कसे होईल ?

'आई मी काल दुपार घर खाणे पेढा देणे' या वाक्यापासून आम्हाला अर्थबोध होत नाही

वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी असणारा संबंध दर्शविण्यासाठी नाम किंवा सर्वनामाच्या रुपात जो बदल केला जातो त्या बदलाला 'विभक्ती' असे म्हणतात

विभक्ती प्रत्यय - नाम किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रुप तयार करताना त्यांना जी अक्षरे जोडतात त्याला विभक्तीचे प्रत्यय म्हणतात

उदा - स, ला, ना, ते, च, चा, ची, इत्यादी

सामान्यरुप - विभक्तीचे प्रत्यय जोड़ताना नामाच्या मूळरुपात बदल होतो त्याला सामान्य रुप म्हणतात.

उदा - घर + ची = घरची
घर + ची = घराची
म्हैस + ला = म्हशीला
मूल + ला = मुलाला
मुले + ना = मुलाना

'घराची' यात मूळ शब्द घर 'ची' हा विभक्तीप्रत्यय घरा हे सामान्यरुप

म्हशीला यात मूळ शब्द म्हैस, 'ला' हा विभक्ती प्रत्यय म्हशी हे सामान्यरुप मुलांना यात मूळ शब्द मुलां, 'ना' हा विभक्ती प्रत्यय, मुला हे सामान्यरुप.

विभक्तीचे आठ प्रकार आहेत त्यांना पहिली विभक्ती दुसरी विभक्ती असे न म्हणता, संस्कृत भाषेतील आठ नावांनी ओळखतात

१) प्रथमा २) द्वितीया ३) तृतीया ४) चतुर्थी
५) पंचमी ६) षष्ठी ७) सप्तमी ८) संबोधन

यात आठव्या विभक्तीला अष्टमी न म्हणता संबोधन असे म्हणतात



©KTBS NOT TO BE REPUBLISHED

18. वयाची अट नाही

E3M3G9

(मूळ लेखिका : सुधा मूर्ती. मराठी अनुवाद : लीना सोहनी)



तेव्हा मी बारा वर्षांची लहानशी मुलगी होते. मी माझ्या आजीआजोबांबरोबर उत्तर कर्नाटकमधील एका खेडयात राहात असे. त्यावेळी दळणवळणाची साधनं काही आजच्यासारखी उपलब्ध नव्हती, त्यामुळे सकाळचा पेपर आम्हाला दुपारीच मिळायचा. नियतकालिकेसुध्दा एक दिवस उशिरा येत. आम्ही सगळेजण पेपर, पत्र आणि मासिकं घेऊन येणाऱ्या बसची मोठ्या उत्सुकतेने वाट बघत असू.



त्यावेळी कन्नड मध्ये त्रिवेणी नावाची एक लेखिका फार लोकप्रिय होती. इतक्या चांगल्या लेखिका अभावानेच पाहायला मिळतात. तिची लेखनशैली सोपी, सुटसुटीत होती. तिच लेखन सर्वसामान्यांच्या पचनी पडेल, त्यांना रुचेल असंच असे. ती माणसामाणसांच्या मूलभूत मानसिक समस्याविषयी लिहायची, त्यामुळे तिचं लिहिणं आम्हाला आपलं वाटायचं. कन्नड साहित्याचं दुर्दैव असं की ती लेखिका अकाली हे जग सोडून गेली. आज चाळीस वर्षे लोटल्यानंतर सुध्दा लोकांना तिच्या कादंबऱ्या आवडतात.

त्यावेळी 'कर्मवीर' नामक कन्नड साप्ताहिकामध्ये तिची एक कादंबरी 'काशीयात्रे' (काशीयात्रा) क्रमशः प्रसिध्द होत असे. एक म्हातारी स्त्री आणि काशी किंवा वाराणसीला जाण्याची तिची दुर्दम्य इच्छा याविषयीची ही कहाणी आहे. काशीला जाणं आणि भगवान विश्वेश्वराची आराधना करणं ही अत्यंत पुण्यप्रद गोष्ट आहे. त्या म्हाताऱ्या स्त्रीचाही असाच गाढ विश्वास होता. काशीला जाण्यासाठी तिची जी धडपड चालली होती, त्याचं वर्णन त्या कादंबरीत रेखाटलेलं होतं त्या कथेत एक अनाथ तरुण मुलगी असते. तिला लग्न करून ध्यायचे असते, परंतु लग्न करण्यासाठी तिच्याकडे पैसे नसतात अखेर म्हातारी स्त्री स्वतःचे काशीला जाण्यासाठी जमवलेले सगळे पैसे त्या मुलीच्या हवाली करते व स्वतः

NOT TO BE REPUBLISHED

काशीला जातच नाही असं दाखवलं होतं. ती म्हणते, ''या पोरक्या मुलीचा आनंद त्या काशीविश्वेश्वराच्या पूजनापेक्षा जास्त महत्वाचा आहे''

माझी आजी कृष्णाक्का कधी शाळेत गेली नाही, तिला लिहिता-वाचता येत नसे. दर बुधवारी ते साप्ताहिक आलं की मी ही कथा तिला वाचून दाखवत असे. त्यावेळी तिला सगळ्या कामाचा विसर पडे. ती अक्षरशः जिवाचा कान करुन त्यातला प्रत्येक शब्द ऐकत असे. ऐकून झाल्यावर तिला त्या कथेचा शब्दनशब्द मुखोद्‌गत झालेला असे. माझी आजीसुध्दा कधीच काशीला गेलेली नव्हती, त्यामुळे कादंबरीतील त्या म्हाताऱ्या आजीबाईशी तिला खूप जवळीक वाटायची. त्यामुळेच गोष्टीत पुढे काय घडतंय याची उत्सुकता इतर कोणापेक्षाही तिलाच जास्त असे. म्हणूनच मला ती कथा तिला वाचून दाखवावीच लागायची. एखादी सुरेख लिहिलेली कादंबरी असेल तर वाचकाला तिचे किती जबरदस्त वेड लागू शकते, हे मला आत्ता समजलंच पण लहानपणी मात्र मी माझ्या आजीला ती गोष्ट वाचून दाखवून लगेच खेळायला बाहेर पळून जायची. देवळाच्या ओसरीत आजी व तिच्या मैत्रिणी रोज भेटायच्या. आम्ही तिथेच लपाछपी खेळत असायचो. त्या सगळ्या जमल्या की या कादंबरीवर त्यांच्यात हमखास चर्चा चाले.

एकदा मी आणि आमच्या घरची काही लहान मुलं आम्ही सगळे शेजारच्या गावात लग्नासाठी गेलो होतो. त्याकाळची लग्नं म्हणजे भलंमोठं खटलं असायचं. आम्हा मुलांची तर नुसती चंगळ असायची. सगळी आतेमामेभावंडं जमायची आम्ही दिवसभर खादाडपणा करायचो मोठ्यांचा काही धाक नसायचा. सगळं नुसतं स्वातंत्र्य. कारण मोठी मंडळी कामात गुंतलेली असत. मी जाताना एक-दोन दिवसांसाठी म्हणून गेले पण नंतर चांगली आठवडाभर तिथे राहिले.

मी गावी परत आले; आणि पाहिलं तर काय, आजीचे डोळे भरून आले होते. मला आश्चर्याचा धक्काच बसला. कितीही संकटं कोसळली तरी आजीला कधी रडताना पाहिलं नव्हतं. काय, झालं तरी काय ? मला काळजी वाटली. ''अव्वा, सगळं ठीक आहेना ? तू बरी आहेस ना ?''

मी तिला अव्वा म्हणूनच हाका मारत असे. उत्तर कर्नाटकात अव्वा, म्हणजे आई.

तिनं नुसती मान हलवली, पण काही बोलली मात्र नाही. मला काहीच कळलं नाही. नंतर मी ते सगळं विसरुनही गेले. तेव्हा आम्ही रात्रीचं जेवण झालं की घराच्या गच्चीत झोपत असू. उन्हाळ्याचे दिवस होते. पौर्णिमा होती. अव्वा माझ्याजवळ येऊन बसली. आपला प्रेमळ

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हात माझ्या कपाळावर फिरवू लागली. तिला माझ्याशी काहीतरी बोलायचं होतं. मला ते कळलं. मी विचारलं "काय झालं गं ?"

''अगं, मी अगदी लहान होते ना, तेव्हा आई वारली. माझा सांभाळ करणारं, मला चांगलंवाईट काय ते समजावून सांगणारं कुणीच नव्हतं. माझ्या वडिलांचा व्याप खूप मोठा होता. त्यांनी दुसरं लग्न केलं. त्याकाळी मुलींना शिक्षण देणं काही इतकं महत्वाचं मानलं जात नसे. त्यामुळे मी कधी शाळेत गेलेच नाही. माझं लहान वयातच लग्न झालं, लगेच मुलं झाली. मी संसारात गुंतले. पुढे नातवंडे झाली. तुम्हा सगळ्यांना चांगलंचुंगलं करुन खाऊ घालण्यातच मला इतका आनंद वाटायचा. आपण शाळेत गेलो नाही अशी खंत कधीतरी वाटायची म्हणुनच आपल्या मुलांनी व पुढे नातवंडांनी भरपूर शिकलं पाहिजे, असा माझा आग्रह असे."

आपली ही बासष्ट वर्षांची आजी हे सगळं आत्ता मध्यरात्रीच्या वेळी आपल्यास का सांगते आहे, हे मला कळेना. मला ती खूप खुप आवडायची. फार प्रेम होतं माझं तिच्यावर. ती आत्ता आपल्याला हे जे सगळं सांगते आहे. त्या पाठीमागे नक्की तसंच कारण असणार असं मला तेव्हासुध्दा वाटलं मी तिच्या तोंडाकडे पाहिलं. तिचा चेहरा दुःखी दिसत होता, डोळे पाण्यानं भरले होते. ती दिसायला छान होती, नेहमी हसतमुख असायची पण त्या वेळेला तिच्या चेहऱ्यावर जी काळजी दाटून आलेली होती, ती मात्र आजही मला स्पष्टपणे आठवते. मी पुढे झुकून तिचा हात हातात घेतला.

"अव्वा, रडू नको ना. काय झालं ? मी काही करु का तुझ्यासाठी ?"

"हो, मला तुझीच मदत लागणार आहे. तुला ठावूक आहे ?" तू गेलीस आणि नेहमीप्रमाणे तो 'कर्मवीर' चा अंक आला. मी तो उघडला. 'काशीयात्रे' गोष्टीचं पान उघडलं, चित्रं पाहिली पण काय लिहिलंय, ते काही मला समजेना. मी कितीतरी वेळा त्या पानांवरुन हात फिरवला. यात काय बरं लिहिलं असेल ? माझ्या बोटांना स्पर्शातून ते कळलं तर किती बरं होईल असं मला वाटत राहिलं. पण ते कसं शक्य होतं ?. मी जर शाळा शिकले असते तर ? म्हणून मग मी तुझी उत्सुकतेनं वाट पाहू लागले. मला वाटलं तू जर लवकर आलीस आणि मला वाचून दाखवलंस, तर किती बरं होईल ! एकदा वाटलं, सरळ असंच उठावं, तिकडे त्या गावी यावं आणि तुला सांगावं वाचून दाखवायला ! मला खरं तर आपल्या गावातल्या कोणाला तरी वाचून दाखवायला सांगता आलं असतं. पण तसं कुणी मिळालच नाही मला. तेव्हा मला खूप परावलंबी आणि असहाय्य वाटलं. माझ्याजवळ इतका

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पैसाअडका आहे; पण मला जर स्वावलंबी होता येत नसेल तर काय उपयोग या सगळ्याचा ?"

यावर काय बोलावं, ते मला समजेना. अव्वा बोलतच होती.

मी ठरवलंय उद्यापासून कन्नडची बाराखडी शिकायची. मी आता खूप मेहनत करणार आहे. हेच आता मी माझं उद्दिष्ट ठरवलंय. दस-याला सरस्वती पूजेच्या दिवशीची मुदत मी स्वतःला घालून घेणार आहे. त्याच्या आत मी लिहा-वाचायला शिकणार. त्या दिवशी बसून मी एकटीनं अख्खी कादंबरी वाचणार. मला स्वावलंबी व्हायचं आहे."

तिच्या चेह-यावरचा दृढ निश्चय स्पष्ट दिसत होता. मला मात्र तिचे शब्द ऐकून हसू फुटले.

"अव्वा, या वयात बासष्टाव्या वर्षी तू मुळाक्षरं शिकणार ? तुझे सगळे केस पांढरे झाले आहेत. तुझ्या हातावर केवढ्या सुरकुत्या पडल्या आहेत. तुला चष्मा लागलाय तुला स्वयंपाकघरात किती काम असतं "

मी पोरकटपणानं माझ्या म्हाता-या आजीची चेष्टा केली. पण तिनं मंद स्मित केलं.

"योग्य कारणासाठी जर आपण दृढ निश्चय दाखवला तर आपल्याला कोणत्याही संकटावर मात करता येते. मी कोणापेक्षाही जास्त मेहनत करीन. पण मी हे नक्की करुन दाखवीन. शिक्षणाला वयाची अट नसते." दुस-या दिवशीपासून आमच्या शिकवणीला सुरुवात झाली. ती इतकी हुशार होती. गृहपाठ करण्याचा तिचा झपाटा तर थक्क करुन सोडणारा होता. ती वाचायची, घोकून म्हणायची, लिहायची आणि पाठ करायची. मी तिची एकमेव शिक्षिका होते आणि ती माझी पहिलीवहिली विद्यार्थिनी. मी एक दिवस कॉम्प्युटर सायन्स शिकवणारी अध्यापिका होणार आहे आणि शेकडो मुलांना शिकवणार आहे, हे तेव्हा मला कुठे माहीत होतं ?

नेहमीसारखा दस-याचा सण आला. एव्हाना 'काशीयात्रे' ही कादंबरी पुस्तकरूपात प्रसिद्ध झालेली होती. मी गुपचूप ती विकत आणली. माझ्या आजीनं दस-याच्या दिवशी सकाळी मला देवघरापाशी बोलावून घेतलं. तिथं तिनं मला चौरंगावर बसवलं. तिनं मला फ्रॉकचं कापड आणलं होतं. त्यावेळी तिनं एक विलक्षण गोष्ट केली. तिन मला वाकून नमस्कार केला. मला आश्चर्याचा धक्का बसला. मनातून खूप अवघडल्यासारखं झालं मला. आपण नेहमी देवाला, वडीलधा-यांना आणि गुरुजनांना नमस्कार करतो. त्यांच्याविषयी आपल्या मनात असलेला आदरभाव व्यक्त करण्यासाठी. ही तर आपली फार मोठी परंपरा आहे. पण आज मात्र काहीतरी विपरीतच घडत होतं. हे काही बरोबर नव्हतं.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्यावर ती म्हणाली, ''हा नमस्कार माझ्या नातीला नव्हे, तर माझ्या गुरुला आहे. माझ्या या गुरुनं मला इतकं प्रेमानं लिहायला-वाचायला शिकवलं आहे, इतक्या आत्मविश्वासाने आणि तेही एवढया थोडया वेळात. आता मी स्वावलंबी आहे. आपल्या गुरुचा मान राखणं., हे माझं कर्तव्यच आहे. लिंगभेदाचा किंवा वयाचा विचार न करता गुरुंना आदर दाखवला पाहिजे, असं आपल्या पूर्वजांनीच लिहून ठेवलेलं नाही का ?''



मग मी पण तिच्या पाया पडले आणि या माझ्या पहिल्यावहिल्या बुध्दिमान विद्यार्थिनीला बक्षीस दिलं. तिनं ते तात्काळ उघडलं आणि पुस्तकाचं शीर्षक मोठ्यांदा वाचलं, 'काशीयात्रे'. त्यानंतर तिने 'त्रिवेणी' हे लेखिकेचं नाव आणि पुस्तकाच्या प्रकाशकाचं नावही मोठ्यांदा वाचलं. आपली ही विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे, हे मला कळून चुकलं.

नवीन शब्दार्थ

समस्या - प्रश्न, अडथळा क्रमशः - क्रमाने, विपरीत - विरुद्ध

पुण्यप्रद - पुण्य देणारी मुखोद्गत करणे - पाठ करणे

दृढ - ठाम, प्रकाशक - पुस्तके प्रकाशित करणारा

उत्तीर्ण - पास, शीर्षक - पाठाचे नाव, उद्दिष्ट - ध्येय

स्वावलंबन - स्वतः वर अवलंबून असणे.

चौरंग - पूर्वीच्या काळी बसण्यासाठी वापरत असलेला उंच पाट.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे एक दोन वाक्यात लिही.

१. कर्मवीर साप्ताहिकात कोणती कादंबरी प्रसिध्द होत होती?

२. उत्तर कर्नाटकात कन्नड भाषेत आईला काय म्हणतात?

३. लेखिकेच्या आजीचे नाव काय होते.?

४. आजीच्या मैत्रिणी कोठे भेटायला जमत असत?

५. लेखिका आणि तिच्या घरातील लोक उन्हाळ्यात कोठे झोपत असत?

६. अव्वाला काय करायचे होते?

७. आजीने लेखिकेसाठी दसऱ्याच्या दिवशी काय आणले होते?

८. शेवटी लेखिकेला काय वाटले?

आ. खालील वाक्ये कोणी, कोणाला व कधी म्हटली ते लिही.

१. ''अव्वा, सगळं ठीक आहे ना ? तू बरी आहेस ना ?''

२. ''अगं मी अगदी लहान होते ना.''

३. ''मला जर स्वावलंबी होता येत नसेल तर काय उपयोग त्या सगळ्याचा ?''

४. ''योग्य कारणासाठी जर आपण दृढ निश्चय दाखवलात तर आपल्याला कोणत्याही संकटावर मात करता येते''

५. ''हा नमस्कार माझ्या नातीला नव्हे तर माझ्या गुरुला आहे.''

इ. खालील प्रश्नांची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिही.

१. आजीने लेखिकेला आपल्या आयुष्याबद्दल काय संगितले ?

२. आजीने शिकण्याचा दृढ निश्चय का केला ?

३. दसऱ्याच्या दिवशी आजीने काय केले ?

ई. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिही.

उदा : आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे - साप्ताहिक

१. निश्चित वेळी प्रसिद्ध होणारे -

२. दररोज प्रसिद्ध होणारे -

३. पंधरा दिवसातून एकदा प्रसिद्ध होणारे -

४. महिन्यातून एकदा प्रसिद्ध होणारे -

५. वर्षातून एकदा प्रसिद्ध होणारे -

(त्याचबरोबर अशी कोणती पत्रके प्रसिद्ध होतात त्यांची नावे लिही)

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

उ. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिही व वाक्यात उपयोग कर.

१. पचनी पडणे २. जिवाचा कान करणे ३. मुखोद्‌गत करणे

❋ उपक्रम:

(१) मनुष्य हा आयुष्यभर विद्यार्थी असतो हे सुभाषित समजावून देण्यासाठी १० ओळी लिही.

(२) शिकण्यासाठी वयाची मर्यादा नसते, या विषयी १० ओळी लिही.

हे ही करुन पहा -

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही-

१. अंधःकार २. अध्यात्मिक ३. उत्कृष्ट

४. दुर्मिळ ५. संयुक्तिक

भाषाभ्यास

प्रयोग

अर्थपूर्ण विधान करणाऱ्या शब्दांच्या समुहाला आपण वाक्य म्हणतो. वाक्यातील सर्वात महत्वाचा घटक क्रियापद कारण क्रियापद नसेल तर वाक्य पूर्ण होत नाही.

- वाक्यात क्रियापदाने दर्शविलेली क्रिया करणाऱ्याला 'कर्ता' असे म्हणतात. .

- क्रिया ज्याच्यावर घडते ते कर्म वाक्यात कर्ता, कर्म आणि क्रियापद यांचा संबंध असतो. वाक्यातील कर्ता व कर्म यांचे लिंग वचन व पुरुष यांना अनुसरुन क्रियापदाच्या रचनेत बदल होतो.

- वाक्यातील कर्ता व कर्म यांचे लिंग, वचन व पुरुष याना अनुसरुन क्रियापदाची ठेवण, रचना किंवा योजना असते तिला 'प्रयोग' म्हणतात.

प्रयोगांचे मुख्य प्रकार तीन आहेत

१. कर्तरिप्रयोग २. कर्मणिप्रयोग ३. भावेप्रयोग

© BKTBS NOT TO BE REPUBLISHED

१. कर्तरीप्रयोग

खाली दिलेली वाक्यं वाच.

मुलगा आंबा खातो.	मी आंबा खातो.
मुलगी आंबा खाते.	तू आंबा खातेस/खातोस..
आजोबा आंबा खातात.	तुम्ही आंबा खाता.
मुले आंबा खातात.	ते आंबा खातात.

वरील वाक्यात कर्त्याचे लिंग, वचन व पुरुष यांच्याप्रमाणे क्रियापदाचे स्वरुप बदलते. अशा वाक्यांना कर्तरिप्रयोग म्हणतात.

कर्तरि प्रयोगाचे दोन प्रकार आहेतः

१. सकर्मक कर्तरिप्रयोग

२. अकर्मक कर्तरिप्रयोग

अ) सकर्मक कर्तरिप्रयोग

खालील वाक्य वाच

रमेश पत्र लिहितो.

रझिया आंबा खाते.

रेखा स्वयंपाक करते.

मी चित्र काढीन.

ती गाणे गाते.

वरील वाक्यात कर्म दिलेले आहे यातील क्रियापद सकर्मक आहे.

कर्तरि प्रयोगातील क्रियापद हे सकर्मक असेल तर त्याला 'सकर्मक कर्तरिप्रयोग' म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आ) अकर्मक कर्तरिप्रयोग :

खालील वाक्यं वाच

विनू हसतो बाळ रडते.

मुलगी पडली. रॉबर्ट पळतो.

त्या घरी जातात.

वरील वाक्यात कर्म नाही. यातील क्रियापद अकर्मक आहे. कर्तरिप्रयोगातील क्रियापद हे अकर्मक असेल तर त्याला 'अकर्मक कर्तरिप्रयोग' म्हणतातः

कर्तरि प्रयोगात कर्ता नेहमी प्रथमा विभक्तीचा असतो.

कर्तरिप्रयोगात कर्म असल्यास ते प्रथमेचे / द्वितीयेचे असते.

कर्तरिप्रयोगात क्रियापद कर्त्या प्रमाणे बदलते.

स्वाध्याय

खालील वाक्यातील सकर्मक कर्तरिप्रयोग व अकर्मक कर्तरिप्रयोग ओळख.

१. आजोबा सुपारी खातात.

२. अरुण चालतो.

३. आई पाणी पिते.

४. तुम्ही फुले द्यावीत.

५. गोविंद कार्यक्रमाला येईल.

६. तो खुर्चीवर बसला.

७. पाहुणे येतील.

८. आम्ही निघतो.



@KTBS NOT TO BE REPUBLISHED


19. अपंग आम्हा म्हणू नका

I4D3X2

शांता शेळके - (१९२१-२००२) पूर्ण नाव शांता जनार्दन शेळके. शिक्षण एम.ए. मुंबई येथील कॉलेजात मराठी विषयाच्या अध्यापिका म्हणून काम. शांता शेळके या मराठीतील प्रसिध्द कवयित्री म्हणून परिचित आहेत. याशिवाय कथा, कादंबरी, बालसाहित्य इत्यादी वाङ्मय प्रकारात त्यानी विपुल लेखन केले आहे. मानवी भावभावनांचे यथार्थ चित्रण त्यांच्या कवितामधून आपणास पाहावयास मिळते.

'अनोळख, गोंदण, तोचचंद्रमा, वर्षा' हे काव्यसंग्रह 'अनुबंध, काचकमळ, कावेरी, मुक्ता' इत्यादी कथासंग्रह 'ओठ, पुनर्जन्म, भीषण, छाया, मायेचा पाझर' इत्यादी कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत,

(अपंग व्यक्ती सुद्धा काही कमी नाही. कुठल्याही क्षेत्रात अपंग व्यक्ती मागे रहात नाहीत. त्या व्यक्ती इतरांप्रमाणेच व तितक्याच तत्परतेने चमकताना दिसतात. त्याचेच वर्णन खालील कवितेत आले आहे. प्रस्तुत कविता 'कळ्यांचे दिवस फुलांच्या रात्री' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.)



अपंग आम्हां म्हणू नका
तुमच्यापेक्षा उणे वेगळे मुळीच आम्हां गणू नका
अपंग आम्हां म्हणू नका !

© KTRS REPUBLISHED

कळते आम्हां ऊनसावली
सुगंध येतो चोरपाउली
डोळ्यांवाचुन डोळस आम्ही स्पर्श देतसे सहजसुखा
अपंग आम्हां म्हणू नका !

असोत असतिल पाय पांगळे
तरी मनाला पंख आगळे
चढुनी जाऊ उंच हिमालय जिद्द आमुची सरेल का ?
अपंग आम्हां म्हणू नका !

बोटांवाचुन लेखन करतो
फुले पाखरे कशिदा भरतो
धागा धागा विणतो आम्ही चतुराई ही व्यर्थच का ?
अपंग आम्हां म्हणू नका !

क्षणाक्षणाला क्षितिज वाढते
स्वप्नांसंगे भविष्य घडते
उरात ऊर्मी अशी उसळते वेधुन घेऊ अलौकिका
अपंग आम्हां म्हणू नका !

जरी पांगळा, जरिही दुबळा
गगनमार्ग आक्रमितो सगळा
अरुण सारथी सुर्यरथाचा ठावे नच हे तुम्हांस का ?
अपंग आम्हां म्हणू नका !

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

नवीन शब्दार्थ

अपंग - शरीरातील एखादया अवयवात दोष असलेला, दिव्यांग. चोरपाउली - हळूच

डोळस - शाबूत दृष्टीचा सुगंध - चांगला वास

चतुराई - कौशल्ये कशिदा - एक प्रकारचे विणकाम

क्षितिज - जेथे जमिनीला आकाश टेकल्यासारखे वाटते ते ठिकाण.

उर्मी - मनातील भावनांच्या लाटा, सारथी - रथ हाकणारा

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. अपंगांच्या मनात कोणती जिद्द आहे ?

२. त्यांच्या ठायी चतुराई आहे असे कवीला का वाटते ?

३. सूर्यरथाचा सारथी कोण ?

४. सुगंध कसा येतो ?

५. आंधळ्या लोकांना कशामुळे ज्ञान (सहजसुख) मिळते ?

६. पांगळ्या लोकांच्या कशाला आगळे पंख असतात ?

आ. तीन ते चार वाक्यांत उत्तरे लिही.

हाताची बोटे नसलेले लोक आपले कौशल्य कशा प्रकारे दाखवितात ?

इ. खालील कवितेच्या ओळींचा सरळ अर्थ लिही.

१. कळते आम्हां ऊनसावली
   सुगंध येतो चोरपाउली
   डोळ्यांवाचुन डोळस आम्ही स्पर्श देतसे सहजसुखा

२. क्षणाक्षणाला क्षितिज वाढते
   स्वप्नासंगे भविष्य घडते
   उरात ऊर्मी अशी उसळते वेधुन घेऊ अलौकिका

ई. विरुद्ध अर्थाचे शब्द लिही.

डोळस, सुगंध, ऊन, उंच

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

उ. खालील ओळी कंसातील शब्दांच्या सहाय्याने पूर्ण कर.

(सूर्यरथाचा, लेखन, भविष्य, हिमालय, सुगंध)

१. चोरपाउली ..... येतो.

२. चढुनी जाऊ ऊंच .....

३. बोटावाचुन ..... करतो.

४. स्वप्नासंगे ..... घडते.

५. अरुण सारथी .....

ऊ. खालील शब्दांचा अर्थ नमुन्याप्रमाणे लिही.

पांगळेपणा- पायानी चालता न येणे.

१. आंधळेपणा .....

२. बहिरेपणा .....

३. मुकेपणा .....

४. बुध्दिमांद्यता .....

ए. 'नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे.' या सारखे आणखी दोन सुविचार लिही.

१. .....

२. .....

ऐ. खालील वाक्ये वाच आणि तुझ्या वहीत लिही.

१. ज्या नदीचे गटार झाले, तिला नदी म्हणू नये ।

२. जिथे नाहीत झाडे, त्याला जंगल म्हणू नये ।

३. जेथे नाही स्वच्छता, त्याला गाव म्हणू नये ।

४. ज्याला देशाभिमान नाही, त्याला नागरिक म्हणू नये ।

ओ. खालील उतारा वाच व योग्य विरामचिन्हे वापरुन उतारा पुन्हा लिही.

सुरेंद्र जडपावलांनी येत आहे हे पाहताच ते ओरडले असा भेदरटासारखा काय चालतोस भीती वाटते युध्दाचं तसं नाही दादा पण तुम्ही आजारी असताना त्याच्यानं पुढं बोलवलं नाही तिकडे देश संकटात सापडलाय नि तुला माझी काळजी वाटते तू

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

सैनिक आहेस हे लक्षात ठेव सुरेंद्राच्या डोळ्यात एकदम पाणी आलं रडतोस काय असा शंकरराव पुन्हा खेकसले चल आटप लवकर मी येतो स्टेशनवर पोहोचवायला.

औ. खालील शब्दकोडयात कवितेतील दहा शब्द दडले आहेत ते शोध व लिही.

ग	धा	गा	स	सू	मा
ग	चो	ळ	र्य	क्षि	ऊ
न	ली	र	क	ती	न
मा	थ	की	पा	ज	सा
र्ग	लौ	पं	ख	ऊ	व
अ	च	ली	रा	ई	ली

❋ उपक्रम:

* अपंगत्वावर मात करून यशस्वी झालेल्या एकाद्या व्यक्तीची मुलाखत घेऊन तुझ्या वहीत लिहून काढ.

हे. ही करुन पहा

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या तसे लिही.

१. ज्येष्ठ

२. प्रतिष्ठा

३. पिऊन

४. ज्योतिष

५. पूर्णविराम

✦✦✦✦

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

20. जावयाची करामत

D8U9F9

द. मा. मिरासदार (जन्म - १९२७) १९५० नंतर उद्‌यास आलेल्या प्रमुख

कथाकारांमध्ये द.मा. मिरासदारांचा समावेश करावा लागेल. त्यांच्या कथामध्ये सामान्यपणे खेडेगावातील बेरकी. धूर्त, बिलंदर, इरसाल, मिष्किल माणसांचे नमुने आढळतात. 'भुताचा जन्म आणि इतरकथा' 'मिरासदारी' 'बापाची पेंड' हे त्यांचे कथासंग्रह विशेष लोकप्रिय झालेले आहेत. 'जावयाच्या करामती' या पुस्तकातल्या जावयाने केलेली धमाल व त्यातून निर्माण झालेला विनोद प्रस्तुत पाठात आढळून येतो.

दिवाळी मोठया थाटामाटात पार पडली. रोज फराळ पक्वान्ने यात चार दिवस कसे गेले हे कळलेच नाही. जावईबुवांचे उद्या घरी जायचे ठरले. सासूबाईनी आदल्या दिवशी रात्री पुन्हा थाटमाट केला. जेवतांना पोळीबरोबर सगळ्यांना गडयाने मोठे मडके भरुन आणलेली ताजीताजी काकवी वाढायला सुरुवात केली. जावईबुवांनी ऊस, ऊसाचे गुऱ्हाळ, काकवी हे प्रकार कधी बघितलेच नव्हते. सासूबाईनी जावईबुवांना काकवी वाढण्यासाठी भांडे तिरपे केले. तेवढयात जावईबुवां हात आडवा धरून म्हणाले. "छे : छे ! अजिबात नको. काळं काळं तांबुस पातळ काय भानगड आहे ही!" "काकवी म्हणतात तिला." "कसला कवी?" "कवी नव्हे हो काकवी, ऊसाचा रस उकळताना तयार होते ती. काकवी खूप चवदार आणि गोड असते, घ्या थोडी." मेव्हणे खुलासा करुन सांगू लागले. सगळ्यांनी खूप आग्रह केला. ते सारखे नको नको म्हणू लागले. तेव्हा सासूबाईंचा निरुपाय झाला. त्या दुसऱ्या पानाकडे वळल्या इतरांना वाढून पुन्हा ते मातीचे मडके त्यानी शिंक्यावर ठेवले. या गडबडीत काकवीचे चार थेंब जावईबुवांच्या पानात पडले होते. त्यांनी एक थेंब हळूच चाटून पाहिला. ''अरे वा ! छान लागतेय की असे'' मनात म्हणत त्यांनी इकडे तिकडे पाहिले आणि उरलेले चार थेंबही हळूच चाटून टाकले. मस्त आहे. आपण उगाचच नको म्हणालो. उद्या तर गावाला जायचे. आता पुन्हा कोठून मिळणार हा झकास पदार्थ. छट ! चुकले माझे, आता काय करावे बरे ? स्वयंपाक घरात शिंक्यावर सासूबाईना मडके ठेवताना त्यांनी पाहिले होते. रात्री उठून हळूच ते मडके काढून काकवी प्यायची असा बेत त्यानी आखला.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

रात्र झाली. जिकडे तिकडे शांत झाले. जावईबुवांनीही गाढ झोप लागल्याचे सोंग घेतले. मध्यरात्र होऊन गेली. जावईबुवा हळूच उठले व दबकत स्वयंपाकघरात गेले. स्वयांपाकघरात एक लहानशी चिमणी कोनाडयात मिणमिणत होती. त्या अंधूक उजेडात शिक्यावर ठेवलेले काकवीचे मडके स्पष्ट दिसत होते. जावईबापूंनी हात वर करून मडके



काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण जावईबापू फारसे उंच नसल्याने आणि शिंके उंचावर असल्यामुळे मडके काही नीट हाताला लागेना. शोधक नजरेने जावईबुवांनी इकडे तिकडे पाहिले. कोपऱ्यात धुणे वाळत घालायची काठी दिसली. त्यांना एक छान युक्ती सुचली. काठी घेऊन मडक्यावर मारुन छानसे छिद्र पाडून काकवी खाली गळायला लागली की आपण धारेला तोंड लावून पोटभर प्यायचे. असा विचार करुन त्यांनी काठीने नेम धरुन मडक्यावर एक तडाखा मारला. नेम नीट लागला नाही. पण अगदी लहानसे छिद्र पडून थेंब थेंब काकवी खाली गळू लागली. एकेक थेंब तोंडात पडू लागला, पण एकेका थेंबाने त्यांचे समाधान होईना. जरा मोठे छिद्र पाडले तर ? चांगलीच धार लागेल आणि पटदिशी आपले काम होईल. असे म्हणून पुन्हा एकदा जावईबुवांनी दात ओठ खात एक तडाखा मडक्याला लगावला. काकवीची धार पडू लागली. जावईबुवांनी तोंड वर करुन खालीच मुक्काम ठोकला. हातात काठी तशीच धरुन ते गटागटा काकवीच पिऊ लागले. पितापिता मजेने त्यांनी मडक्याला पुन्हा एक तडाखा लगावला. त्या बरोबर मातीचे ते मडके एकदम फुटले मोठा आवाज झाला. काकवीच काकवी झाली. आवाजाने सगळे घर एकदम जागे झाले. आरडाओरड सुरु झाली. स्वयंपाकघरात काहीतरी गडबड आहे, हे सर्वांच्या लक्षात आल्यामुळे प्रत्येकजण तिकडेच निघाले. कुणीतरी आरडा ओरडा केलेला ऐकून जावईबूवा घाबरले. आता अशा अवस्थेत आपल्याला कुणीतरी पाहिले तर? छे! छे ! सगळे यायच्या आत कुठेतरी लपून बसण्यासाठी काकवी माखलेल्या अंगाने जावईबुवांनी उठून धूम ठोकली. बाहेरच्या अंधाराचा फायदा घेतला. पळत पळत ते शेतीमाल साठवण्याच्या अडगळीच्या खोलीत पोहोचले. खोलीत शेतातल्या कापसाचा ढीगच ढीग पडला होता. दार लावून घेऊन त्यांनी ढिगाऱ्यावर घाइघाईन उडी मारली. कापूस अंगावर घेऊन ते त्या ढिगाऱ्यात झक्कास दडून बसले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTPS



नेमके त्याच वेळी दोन चोर घरात शिरुन ट्रंक पेटया उघडून किंमती पातळे, दागिने पिशवीत कोंबून ते परत जाण्याच्या विचारात होते. एवढयात आरडाओरड झाल्यामुळे चोरही घाबरुन लपण्यासाठी पळत सुटले. ते देखील अडगळीच्या खोलीत पोहोचले. धाडकन दार वाजल्याने जावईबापू एकदम दचकून उठून उभे राहिले. सर्वांगावर काकवी पडल्यामुळे त्यातून कापसाच्या ढिगाऱ्यावर लोळण घेतल्यामुळे त्यांच्या सर्वांगाला कापूस चिकटला होता. ते शांत उभे राहिल्यामुळे एकदम पांढरे अस्वल दिसावे तसे दिसू लागले. अडगळीच्या खोलीत एकदम पांढरे अस्वल पाहून आडदांड चोरांचीही पाचावर धारण बसली. जावईबुवा कापसाच्या ढिगाऱ्यावरुन वेडे वाकडे हातवारे करत तोल सावरत चालू लागल्यामुळे आणि जणू चोरांना अस्वलच नाचत आहे असा देखावा दिसू लागल्यामुळे त्यांची दातखीळच बसली. त्यांचे हात पाय लटलट कापू लागले. तेवढयात नाचता नाचता ते अस्वल म्हणाले. कोण रे तुम्ही ? इथं काय करताय ? आता मात्र नाचणारे अस्वल माणसासारखे बोलूही लागते. हे पाहिल्यावर त्यातला एक चोर बेशुध्द होऊन खाली कोसळला तर दुसरा एकदम किंचाळला. ''मेलो धावा.'' अडगळीच्या खोलीतून एकदम आरडाओरडा ऐकू आल्यामुळे स्वयंपाकघरातील मंडळी धावत तिकडे आली. पाहतात तो एक चोर बेशुध्द पडलेला, दुसरा लटलट कापत होता. हातातील दागिन्यांचा डबा खाली पडून त्यातील दागिने इकडे तिकडे जमिनीवर पडले होते आणि एक पांढरे अस्वल विचित्र हातवारे करत कापसाच्या ढिगाऱ्यावर उभे असलेले पाहून घरची मंडळी भेदरलीच. एक दोघांची बोबडीच वळली. काहीनी घाबरून एकमेकांना मिठयाही मारल्या. तेवढयात जावईबुवा खदखदा हसून बायकोला म्हणाले, अगं, मला ओळखलं नाहीस ? कमाल आहे तुझी त्या बरोबर बायकोही भिऊन किंचाळत पळत पळत घरात गेली. हळूहळू सगळा प्रकार ध्यानात आला. जावईबुवांच्या उद्योगामुळे चोर सापडले. जो तो त्यांची स्तुती करु लागला. सकाळी कापूस काकवी सगळा प्रकार धुऊन काढून अंग स्वच्छ झाल्यावर जावईबुवा फुशारकी मारत म्हणाले. ''मी त्या चोराना बदडून काढण्यासाठी काठीने मारत होतो. पण काठी चुकून काकवीला लागून ती सगळी अंगावर सांडली. मग मी दुसरी युक्ती केली. म्हंटले ! अस्वल होऊन दणका द्यावा त्यांना.'' असे म्हणत समोर आलेल्या स्वादिष्ट पदार्थाची चव घेत त्यांनी ढेकर दिली.

जावयाने केलेल्या साहसाबद्दल सासूच्या डोळ्यात आणि नवऱ्याने केलेल्या पराक्रमाबद्दल बायकोच्या डोळ्यात कौतुकाचे भाव ओसंडून वाहत होते.

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

नवीन शब्दार्थ

कोनाडा - भिंतीत असलेली लहान साहित्य ठेवण्याची जागा.

किंचाळणे - मोठयाने ओरडणे.

लगावणे - मारणे

भेदरणे - घाबरणे.

धूम ठोकणे - पळून जाणे

पाचावर धारण बसणे - खूप घाबरणे

दबकत - पायाचा आवाज न करता

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. स्वयंपाकामध्ये जेवणात कोणता रुचकर पदार्थ वाढला होता ?

२. सासूबाईंनी मडके कोठे ठेवले ?

३. जावईबुवानी काकवी पिण्यासाठी कोणती युक्ती केली ?

४. जावईबूवा का घाबरले ?

५. चोरांची कशी फजिती झाली ?

६. पांढऱ्या अस्वलाच्या रुपातील जावईबुवांना पाहताच घरच्या मंडळींची अवस्था काय झाली ?

आ. खालील वाक्य कोणी कोणाला म्हटली ते लिही.

१. ''कवी नव्हे हो, काकवी, ऊसाचा रस उकळताना तयार होते ती.''

२. ''कोण रे तुम्ही ? इथं काय करताय ?''

३. ''अगं, मला ओळखलं नाहीस ? कमाल आहे तुझी.''

इ. समानार्थी शब्द लिही.

१. स्वाद २. रात्र ३. स्तुती ४. अंधार

५. चोर ६. साहस

ई. विरुध्द अर्थाचे शब्द लिही.

१. चविष्ट २. गोड ३. समाधान ४. बाहेर ५. स्तुती

उ. खालील शब्दांचा योग्य अर्थ खाली दिलेल्या रकान्यात लिही.

१. खूप स्वाद असणारे

२. नाद असणारा


३. मोठा

४. चवदार

५. लहान

६. खूप रागीट

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



ऊ. खालील वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

१. बेत करणे २. धूम ठोकणे ३. पाचावर धारण बसणे.

*** उपक्रम :**

१. द.मा. मिरासदार, शंकर पाटील, पु.ल. देशपांडे यांच्या विनोदी कथा मिळवून वाच.

२. जावयाची फजिती यावरील कथा मिळव व वाच.

हे ही करुन पहा

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या लसे लिही.

१. निष्कर्ष २. निष्कलंक ३. नेत्रदीपक

४. नृत्ये ५. नौकाविहार

*** मुद्यावरुन गोष्ट तयार कर व गोष्टीला योग्य शीर्षक दे.**

एक जंगल.....पारधी.....पक्ष्यांची शिकार.....जळे पसरले ..... पक्षी अडकले. ..... खूप प्रयत्न केला. .....मोठया कबुतराने..... पक्ष्याना आवडले.....पारध्याला खूप आनंद.....मोठया कबुतराने..... सर्व पक्षी.....कबुतरांने खूण केली..... .....पारधी दुःखी झाला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

२) कर्मणि प्रयोग

१.	मुलाने आंबा खाल्ला.	मुलांनी चिंच खाल्ली.
२.	मुलींनी आंबे खाल्ले.	मुलींनी चिंचा खाल्ल्या.
३.	तू काकडी खाल्लीस.	तुम्ही काक़डया खाल्ल्या.

वरील वाक्यात आंबा, चिंच, काकडी हे कर्म आहेत कर्माचे लिंग व वचन यानुसार वरील वाक्यातील क्रियापदाचे स्वरुप बदलते. जेव्हा वाक्यात क्रियापदाचे रुप कर्माचे लिंग, वचन यांच्यानुसार बदलते अशा वाक्यांना कर्मणिप्रयोग म्हणतात.

- कर्मणिप्रयोगात क्रियापद नेहमी सकर्मक असते
- कर्मणिप्रयेगात कर्ता नेहमी तृतीयेचा असतो.
- कर्मणिप्रयोगात कर्म प्रथमेचे असते
- कर्मणिप्रयोगात क्रियापद कर्माप्रमाणे चालते.

नवीन कर्मणि प्रयोग

हा प्रकार जुन्या वाक्यांत फारसा येत नाही

	सकर्मक कर्तरि	नवीन कर्मणि
१.	पहारेकरी चोरास पकडतो.	पहारेच्याकडुन चोर पकडला जातो.
२.	तो हे काम करेल.	त्याच्याकडून हे काम केले जाईल
३.	राम रावणास मारतो	रामाकडून रावण मारला जातो.

कर्त्याला कडून हा शब्दयोगी अव्यय जोडला जातो. वाक्याचा काळ बदलत नाही. क्रियापदाचे स्वरुप काळानुसार बदलते.

उदा :पकडतो - पकडला जातो

करेल - केले जाईल

मारले - मारला गेला

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

21. वाढती लोकसंख्या एक समस्या

संकलित



मुलांनो, आपल्या देशालाच नव्हे तर साऱ्या विश्वाला अनेक समस्याना तोंड द्यावे लागत आहे. दररोज वर्तमानपत्र उघडले किंवा टी.व्ही. चॅनल सुरु केला तर कोणती ना कोणती समस्या आणि त्यावर चर्चेचे गु-हाळ सुरुच असते. वाढती गुन्हेगारी, दहशतवाद, पर्यावरणप्रदूषण या सर्व समस्यांचे मूळ म्हणजे, वाढती लोकसंख्या हे होय. लोकसंखेचा विस्फोट ही भारतापुढील नव्हे तर साऱ्या विश्वापुढील एक गंभीर व चिंताजनक समस्या बनली आहे. विकसनशील देश विकासाकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु वाढत्या लोकसंख्येची समस्या त्या विकासाच्या आड येत आहे.

पूर्वी शांततेच्या काळात व चांगल्या पीकपाण्यामुळे आलेल्या सुबत्तेच्या काळात लोकसंख्येत अत्यल्प प्रमाणात वाढ होत असे. तसेच पृथ्वीवर येणाऱ्या रोगाच्या साथी, युध्द, दुष्काळ व महापूर यामुळे लोकसंख्या मोठ्या प्रमाणात कमी होत असे. त्यामुळे लोकसंख्यावाढीला निसर्गामार्फतच आळा बसत असे. लोकसंख्यावाढीचा धोका इ.स. १७१८ मध्ये थॉमस माल्थस् यांनी लोकसंख्या या निबंधाव्दारे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला होता. लोकसंख्यावाढीवर नियंत्रण घालण्यासाठी व त्याबद्दल जागृती निर्माण व्हावी म्हणून ११ जुलै हा दिवस संपूर्ण जगात जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्यात येऊ लागला आहे.

लोकसंख्या वाढली तर बिघडले काय ? असे आपल्या मनात येणे साहजिकच आहे. पण ही समस्या साऱ्या समस्यांची जननी आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. लोकसंख्यावाढीमुळे अन्न, वस्त्र, निवारा, हवा, पाणी, शिक्षण इत्यादी गरजांवर परिणाम होतो. मानवाला जीवन जगण्यासाठी पुरेसे अन्न मिळत नाही. एवढेच नव्हे तर ज्यांना पुरेसे अन्न मिळते त्यांपैकी पुष्कळांना सकस अन्न मिळत नाही. प्रत्येक कुटुंबाला जीवन जगण्यासाठी पुरेसा निवारा असला पाहिजे. परंतू लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात निवारा उपलब्ध होत नाही. त्यामुळे निवाऱ्याच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत. शहरी भागात निवाऱ्याची सोय झाली नाही तर त्या शहरांमध्ये झोपडपट्टयांची संख्या वाढते. झोपडपट्टी म्हणजे त्या पाठोपाठ अनारोग्य, अनिष्ट चालीरीती, सुखसोयींचा अभाव, बेकारी, गुन्हेगारी या गोष्टी

© BALBHARATI NOT TO BE REPUBLISHED

आल्याच. लोकसंख्यावाढीमुळे सर्वांनां नोकऱ्या, उद्योग मिळत नाहीत. युवकांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. कित्येक तरुण शिक्षण घेऊनही उद्योगधंदे नसल्यामुळे बेकार झाले आहेत. त्याचा परिणाम नैतिकमूल्यांवर होत आहे. आज शिक्षण ही प्रत्येक मानवाची जीवनावश्यक गरज आहे. पण प्रचंड लोकसंख्येमुळे सगळ्याच विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. आपोआपच दिवसेंदिवस गुणवत्ता खालावत चालली आहे.

दिवसेंदिवस महागाईचा भस्मासुर चटके देताना दिसत आहे. यालासुध्दा वाढती लोकसंख्याच कारण आहे. साधनसंपत्तीचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे वस्तूंची टंचाई व पर्यायाने वस्तुंच्या किंमतीत वाढ. वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपत्ती कमी होत आहे. आणि याचा परिणाम म्हणून पर्यावरणप्रदूषण ही समस्या उद्‌भवली आहे. म्हणजेच पर्यावरणाचे प्रदूषण वाढण्यामागेही लोकसंख्या कारणीभूत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. लोकसंख्येच्या अफाट वाढीमुळे वाहनांचे प्रमाण वाढले व त्यांच्या अती वापरामुळे ध्वनिप्रदूषण, वायुप्रदूषण या समस्या निमार्ण झाल्यामुळे. त्यांचा मानवी जीवनावर परिणाम होत आहे. या प्रदूषित वायु मूळे दमा, क्षय, कर्करोग इत्यादी रोगांचा प्रसार होत आहे. समृध्द आणि निरामय जीवन जगण्यामाठी पर्यावरणाचा समतोल राखला गेला पाहिजे. त्यासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर जपून करणे गरजेचे आहे. पण प्रथमतः आपण पर्यावरणाचा मुक्तपणे वापर करणाऱ्या मानवावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. कारण लोकसंख्यावाढ व पर्यावरण प्रदूषण यांचा परस्परसंबंध आहे. म्हणून प्रत्येक कुटुंबाने कुटुंबनियोजन हे राष्ट्रीय कर्तव्य समजून त्या कर्तव्याचे पालन करणे, ही पर्यावरणाच्याच नव्हे तर मानवी जीवनाच्या दृष्टीने काळाची गरज आहे. म्हणून मुलगा किंवा मुलगी असा भेद न करता सर्वांना जगण्याचा समान हक्क आपण मिळवून दिला पाहिजे.

NOT TO BE PUBLISHED

नवीन शब्दार्थ :

विश्व - जग
गुऱ्हाळ - उलटसुलट चर्चा
विस्फोट - मोठा उद्रेक
चिंताजनक - काळजी करण्याजोगी
विकसनशील - विकासाकडे वाटचाल कारणारे
अत्यल्प - कमी
जननी - आई
अनिष्ट - वाईट
सकस - सत्वयुक्त
निवारा - आसरा
भस्मासुर - डोक्यावर हात ठेवताच भस्म करणारा असूर
निरामय - आनंदी

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१. संपूर्ण विश्वाला भेडसावणारी समस्या कोणती?

२. वाढती लोकसंख्या ही समस्या कोणत्या देशांना अडसर ठरत आहे.

३. पूर्वी लोकसंख्येवर नियंत्रण कोण घालत असे?

४. जागतिक लोकसंख्यादिन कोणता?

५. आपल्या गरजा कोणत्या?

६. झोपडपट्टया का वाढत आहेत?

७. शैक्षणिक सुविधा न मिळाल्यामुळे कशावर परिणाम होत आहे?

८. दूषित हवेमुळे कोणत्या रोगांचा प्रसार होत आहे?

९. आपले राष्ट्रीय कर्तव्य कोणते?

आ. चार ते पाच वाक्यात उत्तरे लिही -

१. लोकसंख्येचा विस्फोट ही देशापुढील समस्या कशी बनली आहे?

२. लोकसंख्येवर निसर्गामार्फत कसे नियंत्रण ठेवले जात असे?

३. वाढत्या लोकसंख्येचा, युवकांवर कोणता परिणाम होत आहे?

४. लोकसंख्या व पर्यावरणप्रदूषण यांचा कसा संबंध आहे?

इ. पाठाच्या आधारे रिकाम्या जागा भर -

१. इ.स. १७१८ मध्ये ..... यांनी लोकसंख्येवर निबंध सादर केला.

२. ११ जुलै हा ..... दिन आहे.

३. लोकसंख्यावाढ ही साऱ्या समस्यांची ..... आहे.

४. ..... ही प्रत्येक मानवाची जीवनावश्यक गरज आहे.

५. दिवसेंदिवस ..... चटके देत आहे.

ई. जोड्या जुळव -

१. साधनसंपत्तीचा तुटवडा	श्वसन रोग
२. निवाऱ्याची समस्या	राष्ट्रीय कर्तव्य
३. वाढती गुन्हेगारी	बेकारी
४. वायुप्रदूषण	स्तूंची टंचाई
५. कुटुंब नियोजन	झोपडपट्टी

© SCERT NOT TO BE REPUBLISHED

उ. शब्दातील फरक सांग -

१) चिंता - चिता -

२) वस्तू - वास्तु -

३) नियंत्रण - निमंत्रण -

४) अध्ययन - अध्यापन -

ऊ. विरुध्दार्थी शब्द लिही -

प्रगती, नैसर्गिक, आरोग्य, उद्योग -

ए. शब्दसमूहास एक शब्द लिही -

१. आपोआप निर्माण झालेले -

२. कामधंदा नसलेला -

३. लोकांत भीती निर्माण करणे -

४. विकासाकडे वाटचाल करणारा -

५. निसर्गातील सजीव निर्जीव घटक मिळून बनलेले -

ऐ. जर, तर, वापरुन वाक्ये पूर्ण कर.

१. लोकसंख्या वाढ मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत.

२. अधिक झाडे वाढविणे हवा शुद्ध राहते.

३. चांगले शिक्षण मिळणे देशाची प्रगती होते.

४. वस्तूंची टंचाई भाववाढ होते.

ओ. कुटुंब लहान सुख महान यावर १० वाक्य लिही.

औ. खालील विशेषणांपासून भाववाचक नामे बनव -

सुंदर, गरीब, प्रामाणिक, मधुर, प्रतिभा

उपक्रम. वाढती लोकसंख्या सर्व समस्यांचे मूळ यावर वर्गात चर्चा कर.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाषाभ्यास

३. भावेप्रयोग

खालील वाक्यं वाच

१. दादाने बैलास धरले.	आईने बैलास धरले.
दादाने गाईस धरले.	आईने गाईस धरले.
दादाने वासरास धरले.	आईने वासरास धरले.

वरील वाक्यात कर्ता व कर्म एकवचनात आहेत. कर्माचे लिंग अनुक्रमे पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग अहे.

२. दादाने बैलांना धरले. आईने बैलाना धरले
दादाने गाईना धरले. आईने गाईना धरले
दादाने वासराना धरले. आईने वासराना धरले

वरील वाक्यांत कर्ता एकवचनात, व कर्म अनेकवचनात आहे. कर्माचे लिंग अनुक्रमे पुल्लिंग स्त्रिलिंग व नपुंसकलिंग आहे.

३. मी बैलांना **धरले.**
तुम्ही गाईना **धरले**
त्यांनी वासरांना **धरले**

वरील वाक्यात क्रियापदाचे रुप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग वचनप्रमाणे बदलले नाही. ते नेहमी नपुंसकलिंगी एकवचनी तृतीयपुरुषी रहाते.

ज्या वाक्यात क्रियापद हे कर्ता किंवा कर्म यांच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे न बदलता स्वतंत्र रहाते तसेच क्रियापदाचे स्वरुप नेहमी नपुंसकलिगी, एकवचनी, तृतीय पुरुषी रहाते, अशा वाक्य रचनेला भावेप्रयोग असे म्हणतात.

भावेप्रयोगाचे दोन उपप्रकार आहेत.

१) सकर्मक भावे प्रयोग २) अकर्मक भावेप्रयोग

१) ज्या भावेप्रयोगातील वाक्यात कर्म आहे तो सकर्मक भावे प्रयोग होय
उदा. आईने **वासरास** धरले.
गवळ्याने **गाईना** बांधले.
शिक्षकाने **मुलांना** शिकविले.

२) ज्या भावेप्रयोगातील वाक्यात कर्म नसते तो अकर्मक भावेप्रयोग होय.

१) मुलांनी खेळावे. २) तो गेला ३) त्याने यावे.

- भावेप्रयोगात कर्ता तृतीयेचा / चतुर्थीचा असतो.
- भावेप्रयोगात कर्म असल्यास ते सप्रत्ययी द्वितीया विभक्तीचे असते.
- भावेप्रयोगात क्रियापद तृतीयपुरुषी एकवचनी, नपुंसकलिंगी असते.

✦✦✦✦

© MTBS NOT TO BE REPUBLISHED

22. भलरी

X3S1H1

कवी गिरीश - (१८९३ - १९७३) पूर्ण नाव शंकर केशव कानेटकर. ते पुणे व सांगली येथे कॉलेजात मराठी विषयाचे प्राध्यापक होते. त्यांच्या कविता हृदयस्पर्शी आहेत. कांचनगंगा, फलभार हे काव्यसंग्रह. अभागी कमल, कला व आमराई ही खंडकाव्ये प्रसिध्द आहेत. ते रविकिरण मंडळाचे प्रमुख सभासद होते.

(खेडयातील सुगीचे दिवस व त्याचे वर्णन कवी गिरीश बहारदारपणे करतात प्रस्तुत कवितेत सुगीचे वर्णन आलेले आहे. या सुगीच्या गाण्यांना भलरीगीत असेही म्हणतात.)

भलरी घाला चला गडयांनो भलरिचं गा गीत
गडयांनो भलरिचं गा गीत ।।धृ।।
पाझरला रस ह्यो चन्देरी
डोंगर झालं समदं रुपेरी
घुमू लागलं आनन्दाचं शेतातुन संगीत
गडयांनों शेतातुन संगीत । भलरी ।।१।।
पाचोळ्यातुन सळसळणारा
झुळझुळुनी ह्यो शीतल वारा
स्वच्छंदान गात चालला आपुल्याच लहरित
गडयांनो आपुल्याच लहिरीत । भलरी ।।२।
सूर लावुनी येडयावानी
ओढा गायी अपुली गाणी
सजण लागला जणू लावणी गाया खडकाळीत
गडयांनो गाया खडकाळीत । भलरी. ।।३।।
लवुन जुन्दळा देई डोल
राजा अपुला ह्यो बिनमोल



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

गाऊन त्येला, घाम जरासा गाळू या मातीत

गडयांनो गाळू या मातीत ।भलरी. ।।३।।

कणखर दावुन म्हराटबाणा

गोळा करु या मोतीदाणा

इर्जिक खावू आनंदान, बसून मग काळीत

गडयांनो बसून मग काळीत ।भलरी ।।५।।

नवीन शब्दार्थ

भलरी - सुगी
शीतल - थंड, गार
इर्जिक - कष्टाने मिळविलेले
येडा - वेडा
काळीत - काळ्या मातीच्या शेतात.
त्येला - त्याला
चंदेरी रुपेरी - चांदीच्या रंगाचे
पाचोळा - कचरा
स्वच्छंद - आनंदी
कणखर - कठीण
समदं - सर्व
बिनमोल - अमूल्य

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

स्वाध्याय

अ. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिही.

१. डोंगर कसा दिसत आहे ?
२. घाम कोठे गाळू या असे कवी म्हणतो ?
३. ''इर्जिक खाऊ आनंदानं बसून मग काळीत'' या ओळीचा अर्थ सांग.
४. वारा कसा गात आहे ?
५. भलरीची गीते केव्हा म्हटली जातात ?
६. ही कविता कोणी लिहिली आहे ?

आ. जोड्या जुळव.

१. घुमू लागलं आनंदाचं	-	भलरीचं गा गीत
२. ईर्जिक खाऊ आनंदानं	-	आपुल्याच लहरीत
३. स्वच्छंदानं गात चालला	-	गाळू या मातीत
४. गाऊन त्येला घाम जरासा	-	बसून मग काळीत
५. भलरी घाला चला गड्यांनो	-	शेतातून संगीत.

इ. कवितेत आलेले नमुन्याप्रमाणे लयबध्द शब्द लिही.

नमुना -- चंदेरी - रुपेरी

१) सळसळणारा -

२) देई डोल -

३) म्हराटबाणा -

ई. या कवितेत ग्रामीण भाषेत आलेले शब्द लिहून काढ व त्यांचा सध्याच्या (प्रमाणित) भाषेत अर्थ लिही.

उ. जी या अक्षराने शेवट होणारे दोन अक्षरी शब्द लिहून पूर्ण कर.

१. आईची आई ....जी

२. भाकरी बरोबर खातात ती ....जी

३. फसविणारा ....जी

४. होऊन गेलेला ....जी

५. कबूल होणे ....जी

६. उंचीने कमी असलेली ....जी

७. मुस्लीम पंडीत अथवा न्यायाधीश ....जी

८. कांदा / मिरची घालून तेलात तळलेली ....जी

❋ **उपक्रम:**

या गीतावर नृत्य बसवून सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.

हे ही करुन पहा

खालील शब्द प्रत्येकी पाच वेळा जसेच्या लसे लिही.

१) नौसेना

२) नोंदणीकृत

३) भांडणतंटा

५) मागूनपुढून

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाषाभ्यास

समास :

परस्परांशी सबंध असलेले दोन शब्द लिहीतांना त्यातील प्रत्यय किंवा इतर शब्द गाळून त्या दोन शब्दांचा मिळून जो एक नवा शब्द तयार होतो त्याला **समास** असे म्हणतात

उदा	विद्येचे आलय	-	विद्यालय
	सूर्याचा प्रकाश	-	सूर्यप्रकाश
	राम आणि लक्ष्मण	-	रामलक्ष्मण
	तोंडाने पाठ	-	तोंडपाठ
	वनातील भोजन	-	वनभोजन

सामासिक शब्द - शब्दांच्या एकत्रितपणाने जो शब्द तयार झालेला असतो त्याला सामासिक शब्द म्हणतात.

समासाची पदे - ज्या दोन शब्दांचा समास बनतो ते शब्द म्हणजे सामासिक पदे. यांनाच पोटशब्द असेही म्हणतात.

विग्रह - समासातील गाळलेला शब्द किंवा प्रत्यय लिहून त्याच्या अर्थाची फोड करण्याच्या पध्दतीला विग्रह म्हणतात.

समासिक शब्द	समासाची पदे	विग्रह
राजवाडा	राजा + वाडा	राजाचा वाडा.
व्याघ्रभय	वाघ + भय	वाघापासून भय
तोंडपाठ	तोंड + पाठ	तोंडाने पाठ
खरेखोटे	खरे + खोटे	खरे किंवा खोटे

समासातील प्रधानपद व गौण पदावरुन समासाचे सुख्य चार प्रकार आहेत

१. अव्ययीभाव समास - यात पहिलेपद प्रधान व दुसरे पद गौण असते.

२. तत्पुरुष समास - यात पहिले पद गौण व दुसरे पद प्रधान असते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

३. व्दंव्द समास - यात दोन्ही पदे प्रधान असतात.

४. बहुव्रीही समास - यात दोन्ही पदे गौण असतात.

१) अव्ययी भाव समास -

खालील सामासिक शब्द व विग्रह वाच

सामासिक शब्द	विग्रह
आकंठ	कंठापर्यत
आमरण	मरणापर्यंत
दररोज	प्रत्येक दिवशी
दरशेकड़ा	प्रत्येक शेकडयात
प्रतिदिन	प्रत्येक दिवशी
बिनचूक	चुकी शिवाय
यथाशक्ती	शक्ती प्रमाणे
यथावकाश	अवकाशा प्रमाणे
बेभान	भान न बाळगता
बेशिक्त	शिस्त न पाळता
गैरहजर	हजर न राहता
दारोदार	प्रत्येक दारात
तासन् तास	प्रत्येक तासाला
घडोघडी	प्रत्येक घडीला

ज्या समासात पहिले पद महत्वाचे आहे व सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्ययाचे कार्य करतो त्या समासाला अव्ययीभाव समास म्हणतात.



@KTDS NOT TO BE REPUBLISHED

23. मनातले चांदणे

मधु मंगेश कर्णिक : ज्येष्ठ कथाकार व कादंबरीकार म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्या लेखनात गाव व शहर यातील प्रत्यक्ष आलेले अनुभव उत्कटतेने मांडलेले आढळतात. भाकरी आणि फूल तोरण, तहान, माहीमची खाडी, अबीरगुलाल, माझागाव माझा मुलूख, इत्यादी त्यांची पुस्तके प्रसिध्द आहेत.



© KTBS NOT TO BE PUBLISHED

(गरीब व्यक्तीना जीवनात अनेक संकटांना तोंड द्यावे लागते ते काबाडकष्ट करुन मोठ्या जिद्दीने, चिकाटीने शिक्षण घेतात. हे करीत असताना त्या व्यक्ती कंटाळत नाहीत. अशा व्यक्ती ज्यांच्याकडून आपल्याला प्रेरणा किंवा प्रोत्साहन मिळाले त्यांच्याबद्दल मात्र आदर कायम ठेवतात. प्रस्तुत पाठात अशाच एका मुलाचे चित्रण मनाचे चांदणे यात वाचावयास मिळते.)

त्या दिवसापर्यंत बल्लूला आम्ही कोणीच पाहिले नव्हते. रोज भल्या पहाटे आपल्या दाराच्या फटीतून वृत्तपत्रांची घडी सरकवणारा कोण असतो, हे आपल्याला कुठे माहीत असते ? आपण जेव्हा गाढ झोपेमध्ये असतो, तेव्हा कोणीतरी हळूच ते वृत्तपत्र आणून टाकते, एवढेच आपल्याला ठावूक असते; पण अगदी योगायोगाने त्या दिवशी वृत्तपत्रांची गाडी उशिरा आल्यामुळे, रोज आमच्या दाराखालून पेपर सरकवणारा बल्लू आम्हाला

भेटला. आम्ही सारे त्याची जशी काही वाटच पाहत होतो. ताजी बातमी वाचण्यासाठी प्रत्येकजण उत्सुक असतो. त्या दिवशी आम्हीही पेपरची वाट पाहत होतो, तेवढयात बल्लू दारात डोकावला.

दहा - अकरा वर्षांचे वय, सावळा तजेलदार वर्ण, तरतरीत चेहरा आणि पाणिदार डोळे, चपळ हालचाली ! पेपरची घडी त्याने दारातून आत टाकली, किंचित घुटमळला आणि म्हणाला, थोडं पाणी मिळेल प्यायला ?

आम्ही चहा पीत होतो. मी विचारले, ''चहा पितोस ?''

''नको, पाणी द्या.''

का कुणास ठाऊक, पण मला त्या मुलामध्ये काही वेगळेपणा दिसला. त्याने आत यावे, पाणी प्यावेच - पण आमच्याबरोबर थोडा चहाही घ्यावा, असे मला वाटले. मी त्याला पाणी दिले, ते तो घटघट प्याला. मग त्याने कपाळावरचा, मानेवरचा घाम खिशातल्या रुमालाने टिपला नि म्हणाला,

''सकाळीच तहान लागली, कारण पेपर टाकण्यासाठी धावत गेलो ना घरोघरी.''

''धावत का जावं ? सावकाश जावं.''

''पेपर उशिरा आले. तुमच्यासारख्या साहेब लोकांना ऑफिसात जाण्यापूर्वी पेपर मिळायला हवा, म्हणून धावत आलो. झालंच तर मलाही शाळेत जायला उशीर झाला असता ''

''तू शाळेत जातोस ?''

''हो, सहावीत आहे.''

''कुठल्या शाळेत जातोस ?''

''म्युनिसिपालटीच्या''

''तुझं नाव काय ?''

''बल्लू''

''छान आहे तुझं नाव, बल्लू '' मी त्याचे नाव दोन-तीन वेळा तोंडात घोळवले.

''शाळेतलं नाव बल्लव''

''पण बल्लूच छान वाटतें.''

बल्लू गमतीदार हसला, तेव्हा त्याचे मोत्यासारखे चमकदार स्वच्छ दात दिसले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मग बल्लू काखेत पेपरांची चळत घेऊन लगबगीने, जवळजवळ पळतच निघून गेला. जाताना हसत म्हणाला, जातो, उशीर होईल. नंतर बल्लू सकाळचा दिसला नाही. आम्ही सकाळी उठण्यापूर्वी तो पेपर टाकून निघून जायचा ; पण एके दिवशी रविवारी तो अवचित उगवला. दुपारी बाराचा सुमार होता. दूरदर्शनवर पशुपक्ष्यांवर आधारित चित्रमालिका लागलेली होती व घरातील लहानमोठे सर्वजण ती पाहण्यात रंगून गेले होते. तोच बल्लू येऊन तेथे हजर झाला. सगळ्यांबरोबर तोही ती मनोवेधक चित्रमालिका पाहू लागला. चित्रमालिका संपल्यावर मी बल्लूला विचारले, ''बल्लू, तू केव्हा आलास ?''

''आताच ! सगळे प्राणी पहायला मिळावे. त्यासाठीच मुद्दाम इथं आलो. झालंच तर बिल'' हातातल्या फायलीतून आमचे पेपरचे बिल काढून माझ्या हाती देत तो म्हणाला.

''तुला आता बिल गोळा करायचं काम मिळालं वाटते ?'' मी त्याच्या हाती पैसे देत म्हणालो, ''म्हणजे शेटजींनी तुला बढती दिली.''

बल्लू पूर्वीसारखा प्रसन्न हसला. त्याचे हास्य खरोखरच फार सुंदर होते. ''माझं गणित चांगलं आहे. मी हिशेब बिनचूक करतो, म्हणून शेटजींनी हे बिलांचं काम मला दिलं.''

''किती बिलं बनवतोस ?''

''मी पन्नास बनवतो. त्याशिवाय कॉलेजमध्ये शिकणारे आणखी विद्यार्थीही बिलं बनवत असतात.''

''तुला पगार किती मिळतो बल्लू?''

''शंभर रूपये तो ऐटीत म्हणाला.''

''घरी कोण कोण आहेत तुझ्या ?''

''आई वडील आणि दोन लहान भावंडं. वडील गिरणीत होते, संपात त्यांची नोकरी सुटली.''

जणू काही मी पुढचे प्रश्न विचारीन हे ओळखून बल्लूने सविस्तर माहिती दिली. आमच्या घरापलीकडे असलेल्या झोपड्पट्टीतल्या अनेक गरीब कुटुंबांतील एका कुटुंबातला बल्लू होता. शाळेत जाऊन अभ्यास करत होता. शिकता शिकता मेहनत करुन दरमहा शंभर रुपयांचा हातभार घरच्या संसाराला लावत होता. बल्लूने विचारले, दर रविवारी मी या वेळेला

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

तुमच्या घरी आलो तर चालेल ?''

''का रे ?''

''ही प्राण्यांची मालिका आहे ना, ती मला खूप आवडते. ती पाहण्यासाठी मी येईन. संपली की निघून जाईन.''

''तुझ्या घराशेजारी कोणाचा टी.व्ही. नाही ?''

आमच्या वस्तीत एकदोघांकडे आहेत, पण ते दारं लावून घेतात. माझी आई कामाला जाते त्या शेटजींकडे, तुमच्या टी.व्ही. सारखाच मोठा रंगीत टी.व्ही. आहे तिथं एकदा मी आईबरोबर गेलो, तर ते आईवर रागावले. म्हणाले, ''मोलकरणीच्या मुलासाठी आम्ही टी.व्ही. लावत नाही !'' बोलता बोलता त्याला गहिवरुन आले. तो गप्प राहिला.

''ठीक आहे.... तू दर रविवारी येत जा इथं टी.व्ही. पाहायला बल्लू ''

बल्लूचा चेहरा खुलला. तो आनंदाने उड्या मारतच निघून गेला आणि पुढल्या रविवारी पशुपक्ष्यांवरील चित्रमालिका सुरु होण्यापूर्वी मिनिटभर आधी येऊन हजर झाला. त्या दिवशी कुत्र्यांविषयी माहितीपूर्ण घटनांच्या आधारे एक मनोरंजक कार्यक्रम दाखवला जाणार होता.

''टी.व्ही. बंद केल्यावर बल्लू जायला निघाला. जाण्यापूर्वी तो किंचित घुटमळला आणि त्याने हळूच मला विचारले, तुम्ही लेखक आहात ना ?''

बल्लूचा हा प्रश्न मला अनपेक्षित होता. मी त्याला उलट विचारले, ''तुला कोणी सांगितलं ?

''तुमच्या नावाची पाटी आहे ना दारावर. मी पेपर टाकायला पहिल्यांदा इथं आलो, तेव्हाच ओळखलं होतं. आम्हांला पाचवीला धडा होता तुमच्या 'मोती'चा...''

मला बल्लूचे अधिकच कौतुक वाटू लागले. मी त्याला माझ्याजवळची गोष्टींची, चित्रांची काही पुस्तके भेट म्हणून दिली. तो फारच खूश झाला. म्हणाला, मला गोष्टी वाचायला खूप आवडतं. त्यानंतर बल्लू दर आठवडयाला आमच्याकडे टी.व्ही. पाहायला येऊ लागला. अधूनमधून तो बिलाच्या वसुलीलाही येई. हल्ली तो सकाळी पेपरचे वाटप करत नव्हता. त्याची हुशारी पाहुन शेटजींनी त्याला, वृत्तपत्रांच्या गाडीतून आलेल्या निरनिराळ्या पेपरांचे विभागवार वाटप करुन त्या साऱ्याचा हिशेब ठेवण्याचे अधिक जबाबदारीचे काम दिले होते.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

बल्लूच्या वयाच्या मानाने ते काम जोखमीचे होते, पण बल्लू ते दक्षतापूर्वक आणि प्रामाणिकपणे करत होता. जेव्हा त्याच्या वयाची मुले साखरझोपेत असत, तेव्हा बल्लू आपल्या कामात गुंतलेला असे.

टी.व्ही. वर प्रदर्शित होणारी पशुपक्ष्यावरील मालिका बंद झाली, तरी बल्लू आमच्याकडे अधूनमधून येतच राहिला. आमच्या घरातील सर्वांचा त्याच्याशी एक प्रकारची जवळीक निर्माण झाली. एक दिवस मी लिहिलेले एक पुस्तक तो घेऊन आला नि म्हणाला, ''किती छान वाटतं हे पुस्तक वाचताना. तुमचं कोकण किती सुंदर असेल नाही?''

मी म्हणालो, ''प्रत्येकाला आपला गाव सुंदर वाटतो. तुझाही गाव असेल ना कुठंतरी ? कोकणात नसला तरी देशावर, मराठवाडयात, विदर्भात, कुठंतरी तुझ्या आईवडिलांचं खेडं असेलच. तू तिथं गेलास तर तोही मुलूख तुला सुंदर वाटेल.''

''आम्हाला गावच नाही, तो उदासपणे म्हणाला. माझे आईवडील खेडं सोडून मुंबईत आले त्याला खूप वर्ष झाली. माझा जन्म तर इथला. डोंगर, नदी, कुरणं, झाडं-वेली झाडांवर स्वच्छंद रमणारे पक्षी यांपैकी मी काहीही कधी पाहिलेलेच नाही. मग थोडा वेळ थांबून एकदम तो म्हणाला, मला न्याल तुमच्या गावी ? तुमच्या कौलारु घराच्या अंगणात रात्री पडणारं चांदणं मला पाहायचं आहे ! मुंबईत आम्ही कधी पौर्णिमेचं चांदणं पाहिलं नाही ''

''बल्लू, मी तुला नेईन, माझ्याबरोबर माझ्या कोकणातल्या गावी. तिथं तुला चांदणं पाहता येईल. चांदण्यात मनसोक्त बागडता येईल.''

''खरंच ?'' विश्वास न बसल्यासारखे त्याने मला विचारले.

''मी म्हणालो, खरंच!''

बल्लूच्या डोळ्यांत मी त्या वेळी पौर्णिमेचे चांदणे जणू पाहत होतो.

त्यानंतर लवकरच आम्ही घर बदलले आणि दूरच्या उपनगरामध्ये राहायला गेलो. त्या गडबडीत बल्लूला भेटायचे राहूनच गेले. तोही त्या मुदतीत का कुणास ठावूक फिरकला नाही. बल्लूला दिलेले वचन माझ्याकडून पूर्ण व्हायचा योग नव्हता.

त्यानंतर बरेच दिवस लोटले. बल्लूच्या आठवणी पुसट होत गेल्या. नवी जागा, नवा परिसर, नवी कामे, नवी माणसे यांत चिमुकल्या थेंबासारखा कधीतरी भेटलेला बल्लू हळूहळू हरवून गेला. असेच दिवस उलटत होत आणि एके दिवशी अचानक बल्लू पुन्हा भेटला !

विद्यार्थ्यांसाठी एका मासिकाने लेखनाची स्पर्धा जाहीर केली होती. अनेक नामांकित शाळांतील विद्यार्थ्यांनी त्या स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. निर्णय जाहीर झाला. त्या स्पर्धेतील

© KTRS NOT TO BE REPUBLISHED

विजेत्या बाललेखकांच्या पारितोषिक वितरणासाठी मला संयोजकांनी प्रमुख अतिथी म्हणून बोलावले होते. मी स्पर्धेचा निर्णय पाहिला. पहिले पारितोषिक मिळवणाऱ्या विद्यार्थ्याी लेखकाचे नाव होते - 'कुमार बल्लव कदम' आणि त्याच्या लेखाचे शीर्षक होते. - 'मला न भेटलेले अंगणातील चांदणे !



त्या निबंधावरुन मी नजर फिरवली. बल्लवने सुरेख अक्षरांत लिहिले होते - "माझं एक चिमुकलं स्वप्न आहे, कोकणात किंवा कुठेही मुंबई-बाहेरच्या खेडयात आपलं एक छोटंसं कौलारु घरकुल असावं. त्याला टुमदार अंगण असावं. त्या अंगणात रात्री चंद्राचं शुभ शीतल चांदणं रांगत रांगत यावं - नि मी त्याला कडेवर उचलून घ्यावं !"

बक्षीस घेण्यासाठी बल्लू समोर आला. मघापासून त्याला पाहण्यासाठी मी आतुर झालो होतो. गेल्या तीन - साडेतीन वर्षानंतर बल्लू किती वेगळा दिसत होता ! अशक्त, उंच आणि हाडकुळ्य बल्लूला त्याच्या चमकदार, प्रसन्न हास्यामुळे व पाणीदार डोळ्यांमुळेच मी ओळखू शकलो होतो. बल्लूने माझ्या हातून बक्षीस स्वीकारले. मी त्याच्या पाठीवरुन कौतुकाने हात फिरवला. त्याने मला खाली वाकून नमस्कार केला व म्हणाला, सर, मला तुमचा पत्ता हवा.

मी माझ्या पत्त्याचे कार्ड त्याला दिले आणि म्हाणालो, भेटायला ये या पत्त्यावर. आपल्याला गावी चांदणं पाहायला जायचं आहे ना ?

NOT TO BE REPUBLISHED @KVPRS

पण बल्लू आलाच नाही. त्याऐवजी एके दिवशी त्याचे पत्र आले. त्याने आपल्या सुरेख वळणदार अक्षरांत लिहिले होते - प्रिय सर, तुम्ही मला वाचनाची गोडी लावलीत. त्यामुळे मला लिहायची हौस वाटू लागली. तुम्ही चांदणं दाखवायला गावी नेणार होता मला, ते मी विसरलो नव्हतो. त्याचीच गोष्ट लिहिली नि पहिल बक्षीस मिळालं ! खर तर हे सारं तुमच्यामुळं झाल तुमचे किती आभार मानू सर, मी दहावीच्या वर्गात आहे. पण मध्ये खूप घडामोडी घडल्या. माझे बाबा वारले, आई खूप आजारी असते. मी रात्रशाळेत शिकतो. दिवसा नोकरी करतो. आई भावंड यांची सारी जबाबदारी आता माझ्यावर आहे. तेव्हा मला तुमच्याबरोबर गावी येता येणं शक्यच नाही.

सर, काही लोकांच्या आयुष्यात त्यांना उन्हातून चालाव लागतं. चांदणं त्यांना भेटतच नाही ! तसच माझ झालं असेल का ? पण तुम्ही मला मायेनं, आपुलकीनं म्हणजेच माणुसकीनं वागवलं, त्यातच चांदण्याचा एक कवडसा मला भेटला. तो पुरेसा आहे.

तुमचा नम्र,

बल्लू ऊर्फ बल्लव कदम

मी पत्रावर बल्लूचा पत्ता शोधू लागलो, पण बल्लूने पत्ता लिहिलाच नव्हता!

नवीन शब्दार्थ :

तजेलदार - टवटवीत

दक्षतापूर्वक - काळजीपूर्वक

किंचित - थोडासा,

जरासा चपळ - चलाख

ऑफीस - कार्यालय, कचेरी

चळत - रास

मनोवेधक - मनमोहक, मनाला. वेधून घेणारे.

स्वाध्याय

अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

१. बल्लू कोणत्या शाळेत शिकत होता ?

२. बल्लू दररोज सकाळी काय करत असे ?

३. बल्लू दर रविवारी लेखकाच्या घरी का येत असे ?

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

४. लेखक त्याला कोठे घेऊन जाणार होते ?

५. बल्लूने लिहिलेल्या लेखाचे शीर्षक कोणते ?

आ. दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

१. बल्लूला खेडयात का जावेसे वाटत होते ?

२. बल्लूला केव्हा आनंद झाला ?

३. बल्लूने लेखकांना तुमच्या बरोबर गावी येणे कधीच शक्य नाही असे का सांगितले?

४. बल्लूने लेखात खेडयाचे कसे वर्णन केले होते ?

इ. रिकाम्या जागा भर.

१. विद्यार्थ्यांसाठी एका मासिकाने ..... स्पर्धा जाहीर केली होती.

२. संयोजकांनी प्रमुख अतिथी म्हणून ..... ना बोलाविले होते.

३. बल्लू ..... इयत्त्येत शिकत होता.

४. लेखकांनी बल्लूला ..... व ..... पुस्तके भेट म्हणून दिली.

ई. खालील वाक्ये कोणी कोणाला म्हटली ते लिही.

१. "धावत का जावं ? सावकाश जावं."

२. "तुमच्या कौलारु घराच्या अंगणात रात्री पडणार चांदण मला पहायच आहे."

उ. पाठाच्या आधारे खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिही.

१. महिन्यातून एकदा प्रसिध्द होणारे

२. लेख / निबंधाला दिलेले नाव.

३. लेख लिहिणारा

४. स्पर्धेचे आयोजन करणारा

५. स्पर्धेमध्ये विजेत्याला दिले जाणारे बक्षिस

@KTBS NOT TO BE REPUBLISHED


६. घराच्या छप्परातून येणारा प्रकाश किरण

*** उपक्रम:**

१) - 'माझ्या स्वप्नातले खेडेगाव' यावर आधरित १० ते १५. ओळींचा निबंध लिही.

२) 'बोक्या सातबंडे' हे दिलीप प्रभावळकरांचे पुस्तक मिळवून वाच.

३) शब्दसंग्रह वाढविण्यासाठी शब्दसंग्रह वही तयार कर व दररोज दोन नवीन शब्द वहीमध्ये लिही.



४) खालील चित्र पाहून त्याबद्दल १० ते १५ वाक्ये लिही -

भाषाभ्यास

२) तत्पुरुष समास -

खालील उदाहरणे वाच.		
सामासिक शब्द	विग्रह	तत्पुरुष समासाचे प्रकार
भयग्रस्त	भयाने ग्रस्त	तृतीया बिभक्ती तत्पुरुष

देवघर	देवासाठी घर	चतुर्थी विभक्ती तत्पुरुष
ऋणमुक्त	ऋणापासून मुक्त	पंचमी विभक्ती तत्पुरुष
अश्रुधारा	अश्रूंच्या धारा	षष्ठी विभक्ती तत्पुरुष
देशसेवा	देशाची सेवा	षष्ठी विभक्ती तत्पुरुष
वनमाला	वनातील माला	सप्तमी विभक्ती तत्पुरुष
अमर	मरण नसलेले	नञ् तत्पुरुष (नकारयुक्त)
घनदाट	घनासारखे दाट	कर्मधारय
महात्मा	महान असा आत्मा	कर्मधारय
नवरात्र	नऊ रात्रींचा समूह	द्विगू
त्रिखंड	तीन खंडांचा समूह	द्विगू
आगगाडी	आगीवर चालणारी गाडी	मध्यमपदलोपी
वांगीभात	वांगी घालून केलेला भात	मध्यमपदलोपी
ग्रंथकार	ग्रंथ करणारा	उपपद तत्पुरुष

ज्या समासाचे दुसरे पद महत्वाचे असते, त्याला तत्पुरुष समास म्हणतात

तत्पुरुष समासाचे प्रकार हे त्यातील पहिल्या पदाला लागणारे प्रत्यय विशेषण व नाम इत्यादी गुणधर्मावर अवलंबून असतात.



@KTDS NOT TO BE REPUBLISHED

24. वीर स्त्री रायबागन



स्वाती महाळंक, या स्वतंत्र लेखन करतात तसेच त्या अनुवादक आहेत. आकाशवाणी केंद्राच्या निवेदिका, म्हणून कार्य करतात लहान मुलांमुलींना इतिहासातील घटना समजाव्यात व त्यातून त्यांच्यात नितीमुल्ये वाढावीत यासाठी त्या विशेष प्रयत्न करतात.


(सदर पाठात रायबागानचे धाडस, करारीपणा व दूरदृष्टी हे गुण तसेच शिवाजी महाराजांच्या मनात स्त्रियांबद्दल असलेला आदर याचे वर्णन केले आहे.)

एके दिवशी शिवाजी महाराज संध्याकाळी जिजाबाईंसह राजगडावर फेरफटका मारत असतानाच नजरबाजाने बातमी आणली. शाहिस्तेखानाचा प्रबळ सरदार कहारतलबखान मोठया फौजेसह चालून येत होता. त्याच्या फौजेत अनेक मातब्बर मराठी सरदार आणि खुद्द रायबागन होती. जेव्हा बहिर्जीने खान लोहगडाच्या मार्गान उंबरखिंडीतून कोकणात येणार आहे, असे सांगितले, तेव्हा शिवाजी राजांनी खानाच्या फौजेला उंबरखिंडीतच गाठून गारद करण्याचा बेत मनात पक्का केला. राजांनी सैन्यासह उंबरखिंड गाठली. सारा परिसर हिरव्यागार वनराईने नटला होता. डोंगरांचे तुटलेले अजस्त्र कडे छातीत धडकी भरावी असे दिसत होते. एका बाजूला उंचकडा आणि दुसरीकडे खोल दरी आणि त्यातून मधून जाणारी अरुंद निमुळती उंबरखिंडीची वाट. महाराजांनी सैन्याला ठिकठिकाणी बसविले. तसेच वृक्षांच्या गर्द झाडोऱ्यात टेहळणी करणारे नजरबाज बसविले.

संध्याकाळच्या वेळेला खानाची फौज घाटमाथ्यावर आली. खान स्वतः काळ्या घोडयावर बसून एका बाजूने अमरसिंह तर दुसऱ्या बाजूने रायबागन आणि घोडदळ, तोफांचे गाडे, सामानाच्या गाडया, पायदळ यांच्यासह घाट उतरु लागला. खानाच्या फौजेचा शेवटचा उंट खिंडीत उतरताच चोहोबाजूने साऱ्या रानात नगाऱ्यांचे आवाज उठू लागले. खानासह सगळे भयभीत झाले. ''हा कसला आवाज? इथ रानात कोण नौबत वाजवतय? खानाने न राहून विचारले. तशी रायबागन उत्तरली, ''खानसाहेब शिवाजीन आपल्याला सगळीकडून घेरलय.'' तिने आपली तलवार उपसून घोडयावर बसून घोडयाला टाच दिली, तेवढयात तोफेचा आवाज घुमला. खानाच्या फौजेत एकच गोंधळ उडाला. तोफेच्या गोळ्यांनी खानाचे सैन्य टिपले जात होते. गोंधळलेला खान काय करावे न सुचून हा संहार बघत होता. तेवढ्यात रायबागन आली नि म्हणाली, ''खानसाहेब, खिंडीच्या दोन्ही वाटा बंद झाल्या आहेत. आपण हे धाडस करायला नको होतं.'' तसे खान तिच्याकडे पाहात म्हणाला,

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

रायबागन हिंमत से काम लो.'' तशी रागाने उसळून रायबागन म्हणाली, खानसाहेब तुम्ही तरी मला हिंमत शिकवू नका, माझी हिंमत खुद्द आलमगीर बादशहांनाही ठाऊक आहे.''



रायबागनचे खरे नाव तुळसाबाई देशमुख ! मराठा सरदार उदाराम देशमुखाची ती पत्नी. पतीने युध्दात प्राण गमावल्यानंतर तिने हिरीरीने कारभार सांभाळला. तिचे शौर्य बघून औरंगजेबानेच तिला रायबागन हा किताब दिला. रायबागन म्हणजे राजदरबारतील वाघीण. हीच वाघीण खानाला हे धाडस करायला नको होतं याची जाणीव करुन देत होती. त्यावर खानाने न राहवून विचारले, तुझा सल्ला काय रायबागन ? कुछ भी करके हमे बचाओ. रायबागन हसली नि म्हणाली, ''खानसाहेब, ताबडतोब तुमचा वकील तहासाठी पाठवा. शिवाजी अत्यंत दिलदार राजा असा त्याचा लौकिक आहे.'' तसे खानाने एक वकील पाठविला. वकिलाने राजांसमोर तीनवेळा कुर्निसात करुन आपण खानसाहेब व रायबागन यांच्या आज्ञेवरुन आल्याचे सांगून त्याचा निरोप सांगितला. ''खानसाहेबांना त्यांच्या चुकीचा पश्चाताप होत आहे. शाहिस्तेखानाच्या आज्ञेवरुन त्याना अकारण या मुलुखात याव लागल. फर्जंद शहाजीराजांशी असलेला त्यांचा स्नेह लक्षात घेऊन खानांना जीवदान द्याव एवढीच प्रार्थना आहे.'' राजे हसले नि म्हणाले खानसाहेब आणि रायबागनना आमचा नमस्कार सांगा. त्यांना

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सांगा, शरण आलेल्या शत्रूला आम्ही कधीच धक्का लावत नाही. मात्र खानसाहेबांमुळे आम्हाला आणि आमच्या फौजेला अकारण त्रास पडला. त्यासाठी भरपूर खंडणी द्यावी लागेल. आम्ही त्यांना जायला वाट देऊ. तोवर लढाई सुरुच राहील. "वकिलाने खानाला राजांचा निरोप सांगिला. खानाने सर्व अटी मान्य करुन सुवर्णनाणी, रौप्यनाणी, जडजवाहिराने भरलेल्या संदुका घेऊन वकिलाला आणि त्याच्याबरोबर एक देखणा, ऐटबाज, डोक्यावर डौलदार सोनेरी पागोटे, त्याच्यावर रत्नजडित चांद, अंगात भरजरी अंगरखा, चोळणा, पायात भरजरी चढाव आणि कमरेला रत्नजडित मुठीची तलवार अशा पोशाखातला वीर तरुणही पाठवला. ते महाराजांजवळ पोहोचले. त्या तरुणाने राजांना लवून मुजरा केला व शेल्यात खोवलेली तलवार म्यानासह काढून राजांच्या समोर धरली. त्यावर शिवाजीराजे हसत त्या तरुणाच्या नजरेला नजर देत म्हणाले, "तुमच्यासारख्या सेनापतींची तलवार घेणं आम्हाला योग्य वाटत नाही. आता आमच्याजवळ तुमचा सत्कार करायला मानाची वस्त्रं नाहीत. नाहीतर आम्ही तो जरुर केला असता. तुम्हाला औरंगजेबानं रायबागन हा किताब अत्यंत सार्थपणे दिला आहे. "महाराजांचे उद्‌गार ऐकून तरुणाचा पोशाख धारण केलेली रायबागन म्हणाली" आपण कसं ओळखल महाराज ?" त्यावर राजे म्हणाले, "रायबागन, ते कठीण नव्हतं, असं धाडस तुमच्याशिवाय दुसर कोण करणार ? तुमच्यासारख्या वीर स्त्रीच दर्शन झालं आणि आम्ही धन्य झालो. आम्हास माता भवानी आणि वीरवृत्तीचे संस्कार करणाऱ्या आमच्या आऊसाहेब आठवल्या. आज तुमचा सत्कार करु शकत नसल्यामुळे आम्ही शरमिंदे आहोत." तिने राजांना मुजरा केला पाठ न दाखवता काही पावले मागे चालत माघारी वळली. पण राजांचे शब्द तिच्या कानात घुमत होते. त्यांचे वीरश्रीयुक्त रुप नजरे पुढून हलत नव्हते. त्यांच्या दिलदार स्वभावाने ती अक्षरशः भारावून गेली.

नवीन शब्दार्थ

नजरबाज - नजर ठेवणारे
प्रबल - तीव्र
मातब्बर - श्रेष्ठ, प्रतिष्ठित
गारद - ठार मारणे
अजस्त्र - प्रचंड
संहार - नाश
हिरीरीने - उत्साहाने
संदुक - पेटी
धडकी - भीती
कुर्निसात - मुजरा करणे
जडजवाहिर - सोन्यामोत्याचे दागिने

NOT TO BE REPUBLISHED @SCERT

स्वाध्याय

अ. एका वाक्यात उत्तरे लिही.

१) रायबागनचे खरे नाव काय?

२) तिला रायबागन हा किताब कोणी दिला?

३) शिवाजी महाराजांवर कोणत्या मोंगल सरदाराने आक्रमण केले?

४) शिवाजी राजांनी खानाच्या सैन्याला कोठे गाठले?

आ. दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिही.

१) उंबरखिडीचे वर्णन कर.

२) रायबागनचा पोषाख कसा होता?

३) वकीलाने कोणता निरोप सांगितला?

४) शिवाजी राजांनी रायबागनबद्दल कोणते उदगार काढले?

५) या पाठातून शिवाजी महाराजांचे कोणते गुण दिसून येतात?

इ. खालीले वाक्ये कोणी कोणाला म्हटली, ते लिही.

१) ''आपण कसं ओळखलत महाराज.''

२) ''तुम्ही तरी आम्हाला हिंमत शिकवू नका, माझी हिंमत खुद्द आलमगीर बादशाहानासुध्दा ठाऊक आहे.''

३) ''तुमच्यासारख्या वीर स्त्रीच दर्शन झाल, आम्ही धन्य झालो.''

४) ''त्यांना सांगा शरण आलेल्या शत्रूला आम्ही कधीच धक्का लावत नाही.''

ई. खालील वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग कर.

१. बेत करणे　　२. भारावून जाणे　　३. कुर्निसात करणे

४. धारण करणे.　　५. माघारी वळणे　　६. धडकी भरणे

उ. समानार्थी शब्द लिही :

१) धाडस　　२) कठीण

३) धन्य　　४) लढाई

५) बातमी　　६) फौज

७) घोडा　　८) शत्रू

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

ऊ. रिकाम्या जागी चौकोनातील योग्य अक्षरे वापरुन पाठातील शब्द पूर्णकर. त्या शब्दांचा अर्थ लिही.

क	त	र	ख	ब

१) नौ ब - = ...

२) कि ता - = ...

३) - डा = ...

४) पो शा - = ...

५) वी - = ...

ए. खालील चटकदार अक्षरांची मिसळ वाच व दडलेले योग्य ते शब्द लिहून काढ.

उदा.: काफटरफे - फेरफटका

१) नराबागय -

२) डबरउंखिं -

३) डहगलो -

४) नईराव -

६) रतलावा -

७) दडळघो -

८) रदिदान -

९) जेरंबगऔ -

१०) पसेतीना -

❋ उपक्रम::

१) हिरकणीची कथा मिळव व वाच

२) 'अशीच अमुची आई असती' हे गाणे मिळव व वाच.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

३) द्वंद्व समास -

खालील उदाहरणे वाच -

सामासिक शब्द	विग्रह	द्वंद्व समासाचा प्रकार
आईवडील	आई आणि वडील	इतरेतर द्वंद्व
पशुपक्षी	पशु आणि पक्षी	- " -
पुरीभाजी	पुरी व भाजी	- " -
एकदोन	एक किंवा दोन	वैकल्पिक द्वंद्व
बरेबाईट	बरे किंवा बाईट	- " -
सुखदुःख	सुख किंवा दुःख	- " -
गाईगुरे	गाई, गुरे वगैरे	समहार द्वंद्व
चटणीभाकर	चटणी भाकर वगैरे	- " -
घरदार	घरदार वगैरे	- " -
हळदकुंकू	हळद, कुंकु वगैरे	- " -

अ

ज्या समासातील दोन्ही पदे महत्वाची असतात त्यांना द्वंद्व समास असे म्हणतात या समासाचे प्रकार हे त्याच्या विग्रहावरुन ओळखले जातात

४) बहुव्रीही समास -

खालील उदाहरणे वाच.

नीलकंठ : नील आहे कंठ ज्याचा तो शंकर

दशानन : दहा आनन (तोंडे) आहेत असा तो रावण

लक्ष्मीकांत : लक्ष्मीचा कांत (पती) आहे असा तो. विष्णू

सत्यव्रत : सत्याचे व्रत धारण करतो तो

चौकोन : चार कोन आहेत ज्याला तो

ज्या समासातील दोन्ही पदे महत्वाची नसुन पूर्ण समासावरुन निराळयाच पदाचा बोध होतो, त्यास बहुव्रीही समास म्हाणतात

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

25. शब्दखेळ

खालील चौकोनातील योग्य शब्दांच्या जोडया जुळवून अर्थपूर्ण वाकप्रचार व म्हणी पूर्ण कर व वहीत लिहून काढ.

डर कशाला ३६	रसातळाला ३५	टेकणे ३४	मातीच्या चुली ३३	दोन बोटे उरणे ३२	आकाश ३१
हात गगनाला २५	जाणे २६	घरोघरी २७	कर नाही त्याला २८	स्वर्ग २९	ठेंगणे होणे ३०
खळखळाट फार २४	काखेत कळसा २३	बुडत्याचा पाय २२	उथळ पाण्याला २१	गावाला वळसा २०	बसणे १९
डोक्यावर २३	खोलात २४	चढवणे २५	पळसाला पाने २६	मोठे करणे २७	जीवभांडयात २८
मन १२	पडणे ११	हरबऱ्याच्या झाडावर १०	गर्वाचे घर ९	साजरे ८	चढेळ तो ७
पडेल १	अवलक्षण २	खाली ३	हात दाखवून ४	तीनच ५	दुरुन डोंगर ६

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ओळखा तर....तो कोण?

फिरफिर फिरतो म्हणून
याला उलटा टांगला
तरी याचा मूळ स्वभाव जाईना,
फिरायचा काही राहिना,
तर तो कोण ?

वाऱ्यांवर माया देई छाया
लेशही याचा जाई न वाया
त्याच्यामुळे निर्मळ हवा
मित्र हा साऱ्यांनाचवाटे
हवाच हवा !..... तर तो कोण ?

डोंगराच्या आड राहे एक मित्र
तेजांन त्याच्या दिपती नेत्र
पाहुन त्याला हसती फूले
निद्रेतूनी उठती मुले ... तर तो कोण ?

चिमुरडी वर चिमुरडी
नेसून आली हिरवी साडी
बघता बघता झाली लाल
खाणाऱ्याचे हालचं हाल ... तर ती कोण ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रथम सत्रामध्ये तुम्ही कवी होण्याचा एक प्रयत्न केला आहात थोडे फार जमले असेल आणखी एक प्रयत्न केला आहात थोड़े फार जमले असेल आणखी एक प्रयत्न करून पहा कवी व्हा.

हिरवं हिरव रान

रानात .....

झाडांना .....

फांद्यांना .....

पानांत .....

घरटयांत .....

पिल्लांच्या .....

चोचीत .....

दाण्याचं .....

कोठारात .....

उंदरामागे .....

मांजराचा .....

मालकाचा .....

कुत्रा भुंके .....


.....

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED


चित्र पाहून म्हण किंवा वाक्प्रचार लिही.





(1) .....

(2) .....



(3) .....

(4) .....

©KES NOT TO BE REPUBLISHED

26. गोडगाणी

कोळीनृत्य

राजा सारंगा, माज्या सारंगा
डोलकरां रं धाकल्या दीरा रं
चल जाऊया घरा !

आज पुनवा सुटलय दमान
दरियाच्या पान्याला आलय उधान
पिऊन तुफानवारा ।।१ ।।

शीड फाटल धावतं पाठी
तु सुकानू मोरली काठी
फेसाल पान्याचा घेरा ।।२ ।।

कोलीवाडा रं राहीला दूर
डोल लोटोला पान्याचा पूर
संबाल संसार सारा ।। ३ ।।

गंमत गाणे

कारल्याचा वेल लाव ग सुने, लाव ग सुने
मग जा आपुल्या माहेरा, ग माहेरा

कारल्याचा वेल लावला हो सासुबाई,
आतातरी जाऊ द्या माहेरा, बाई माहेरा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कारल्याचा कारली येऊदें ग सुने येऊदे ग सुने
मग जा आपुल्या माहेरा.

कारल्याचा कारली आली हो सासुबाई,
आतातरी जाऊ द्या माहेरा, बाई माहेरा.

कारल्याची भाजी कर ग सुने, कर ग सुने,
मग जा आपुल्या माहेरा, बाई माहेरा.

कारल्याची भाजी खा ग सुने, खा ग सुने,
मग जा आपुल्या माहेरा, बाई माहेरा.

कारल्याची भाजी खाल्ली हो सासुबाई,
आतातरी जाऊ द्या माहेरा, बाई माहेरा,

आणा फणी, घाल वेणी, जाऊ द्या राणी माहेरा, बाई माहेरा
आणली फणी, घातली वेणी, गेली सुनबाई माहेरा, बाई माहेरा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सदैव सैनिका

सदैव सैनिका पुढेंच जायचें ।
न मागुति तुवा कधी फिरायचें ।।
सदा तुझ्यापुढें उभी असे निशा ।
सदैव काजळी दिसायच्या दिशा ।।
मधून मेघ हे नभास ग्रासती ।
मधेंच या विजा भयाव हांसती ।।

दहा दिशांतुन तुफान व्हायचे ।
सदैव सैनिका पुढेंच जायचे ।। १ ।।

प्रलोभने तुला लोभ दाविती ।
न मोह बंधने पदांस बांधती ।।
विरोध क्रोध ना तुला न थांबवी ।
न मोह भासतो गजांत वैभवीं ।।
न दैन्यही तुझें कधीं सरायचे ।
सदैव सैनिका पुढेंच जायचें ।। २ ।।

वसन्त वा शरद् तुला न ती क्षिती ।
नभांत सूर्य वा असो निशापती ।।
विदीर्ण वस्त्र हो मलीन पावले ।
तरी न पाय हे कधी विसावले ।।
न लोचनां तुवां सुखे मिटायचें ।
सदैव सैनिका । पुढेंच जायचे ।। ३।।

नभात सैनिका प्रभात येउ दे ।
खगांसवें जगा सुखांत गाऊं दे ।।
फुलाफुलावरी सुवर्ण शोभू दे ।
जगास शांतता सुहास्य लाभू दे ।।
न पाय तोंवरी तुझे ठरायचे ।
सदैव सैनिका पुढेंच जायचें ।। ४ ।।

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

शब्दसंग्रह

अ

अनुभव
अनन्यसाधारण
अनवाणी
अधिवेशन
अध्याय
अभियंता
अकौंटंट
अथांग
अस्ताव्यस्त
अचंबा
अक्राळ विक्राळ
अर्णव
अतिवृष्टी
अनावृष्टी
अवघे
अनाथ
अमूल्य
अवधी
अकाली
अपंग
अजस्त्र
अकारण
अवचित
अनारोग्य
असहाय्य
अभावाने
अभयारण्य
अरेरावी
अकादमी

आ

आवर्जून
आण्विक
आकांक्षा
ऑक्टोपस्
आधुनिक
आकर्षित
आत्मचरित्र
आजन्म
आराधना
आदरभाव
आक्रमिणे
आधारित
आतुर
आव्हान

इ

इर्जिक
इभ्रत

उ

उपलब्ध
उणे
उद्दिष्ट
उतीर्ण
उत्सुकता

ऊ

ऊर्मी

ए

एकाएकी

ऐ

ऐटबाज

ओ

ओझोन

क

कणखर
कयास
करुणा
कानगोष्ट
काबाडकष्ट
किमान
कुतूहल
कृतज्ञता
कृत्रिम
कशिदा
कणखर
कवडसा
कल्पतरु
कमंडलु
कुरबुर
कुरण
कुर्निसात
कंथा
कांता
क्रमशः

ख

खटलं
खालावत
खुलणे

ग

गर्द
गहिवरणे
गुदमरणे
ग्लोव्ह्ज
गणणे
गगनमार्ग
गारद
गाढा
गाभारा
गुऱ्हाळ
गुणवत्ता
गुन्हेगारी
गौरव

घ

घडामोडी

च

चाळ
चतुराई
चेतना
चित्रफिती
चौरंग
चंगळ
चॅनल

ज

जान

NOT TO BE REPUBLISHED @KTRS

जीवनमूल्य
जिव्हाळा
जेमतेम
जडजवाहीर
जनी
जलप्रवाह
जनजागृती
जिद्द
जैविक

झ

झोपडपट्टी

ट

टिपणे
टेहळणी
टुमदार
टोपणनांव
टंचाई

ड

डोंबल
डोळस
डौलदार

त

तव
तत्वज्ञान
तिमिर
तीक्ष्ण
त्सुनामी
तरणे
तजेसदार
तात्काळ
तीट

थ

थिटे

द

ददात
दर्शन
दिग्गज
दीनपणा
दक्षता
दास
दाटण
दिलदार
दुबळा
दुतर्फा
दुर्दम
दौरा
दृढ

ध

धनसंपदा
धिप्पाड
धर्मनिरपेक्ष
धाक
धारिष्ट

न

नाडीपरीक्षा
नितांत
निकोप
निष्पाप
नोबेल
नजरबाज
नागरिक
नामांकित
नीच
निरामय
निववावे
निरपराध
नियतकालिक
निर्दय
निर्भीड
नैतिक
नौबत
न्याहरी

प

परिचय
पद
पदलालित्य
पदवीधर
पदव्युत्तर
पर्यावरण
पार
पाठबळ
पारधी
पार्श्वभूमी
पुस
पुरस्कार
प्रतिकूल
प्रेरणास्थान
प्राविण्य
पंचमहाभूते
प्लॅटफॉर्म
परस्पर
पश्चाताप
परंपरा
पाचोळा
पाठीराखा
पांगळे
पुण्यप्रद
पूर्वज
पूर्वसंचित
पैजा
प्रौढशिक्षण
प्रबळ
प्रदर्शित
प्रकाशक
प्रचार
प्रयत्नशील

फ

फाऊल
फाळणी
फुकाचे
फेरफटका

ब

बजावणे
बुद्धिमत्ता
बिनमोल

भ

भरती
भन्नाट
भान
भारतरत्न

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भौतिक
भांडार
भ्याडपणा
भलरी
भरजरी
भयावह
भक्तगण
भस्मासुर
भारावणे
भूपाळी
भ्रम

म

महती
महन्मंगल
मार्मिक
मिळकत
मिणमिण
मंद

मक्का
मरणोत्तर
मध्यबिंदू
मनोवेधक
मनोरंजक
मालिका
मातब्बर
मालकंस
मानसिक
मायदेश
माथे
मुग्ध
मुखोद्‌गत
मूलभूत
मेघ
म्यान

र

रत्नाकर
रोडावणे
रिपू
रुक्ष
रंजले-गांजले

ल

लख्ख
लेखा
लेश

व

वर्चस्व
वावगं
वास्तव्य
वार्धक्य
विकिरण
वैद्यकीय
वदावे
वनराई
वर्तमानपत्र
वाणी
वाचाळ
वाचस्पती
विधी
विवेक
विलक्षण
विस्फोट
विकसनशील
वृक्षवल्ली
व्याप
व्यर्थ

श

शिरस्त्राण
शिनगार्ड
शिरच्छेद
शंकाकुशंका
शीर्षक
शौर्य

स

सत्र
सरिता
सम्राट
सध्दर्म
सहवास
सर्वोच्च
सर्वात्मका
सार्थक
सुजनत्व
सुसहय
सोहळा
संशोधन
संपादित
सांघिक
स्वत्व
स्तोत्र
सकस
समदं
सज्जन
समस्या
समृद्धी
समाविष्ट
सारथी
साप्ताहिक
सिद्धी
सुबत्ता
सोयरी
संपर्क
संहार
संयोजक
स्लाइडस्
स्वावलंबी
स्वच्छंद
स्मित

श्र

श्रृतिका

ह

हिमनग
हुंदका
होतकरु
हवाली
हमखास

क्ष

क्षितिज

ज्ञ

ज्ञानलालसा

@KTDS NOT TO BE REPUBLISHED